रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक २०९
www.ramprahar.com

गुरुवार, १५ फेब्रुवारी २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

तळोजा परिसरातील पाच बेपत्ता मुली दिल्लीत सापडल्या/३
पितळी पत्र्यावर शिवचरित्र साकारणारे संजय राऊळ.../४
भारत आणि इंग्लंडमध्ये आज तिसरी कसोटी/८

## ‘राज्यात सात हजार किमीचे रस्ते, पूल बांधणार’



**मुंबई** : मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेत आणखी सात हजार किमीचे रस्ते व पूल बांधण्याचा निर्णय बुधवारी (दि. १४) मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या टप्पा-२मध्ये १० हजार किमीच्या रस्त्यांचे उद्दिष्ट आहे. यापैकी सात हजार किमी लांबीचे रस्ते कोणत्या जिल्ह्यांमध्ये बांधायचे ते ठरले आहे. तीन हजार किमी लांबीच्या रस्त्यांचे सविस्तर प्रकल्प अहवालास मान्यता देण्यात आली आहे. या टप्प्यात महानगरपालिका, साखर कारखाने, औष्णीक विद्युत केंद्र, वाळू आणि खडीच्या खदानी, मोठ्या नद्या, औद्योगिक परिसरापासून १० किमीच्या आणि नगरपालिका, नगर परिषदा, छावणी बोर्ड हद्दीपासून पाच किमीच्या मर्यादेतल्या रस्त्यांचा दर्जा वाढविण्यासाठी निवड करण्यात येईल.




**पनवेल : महापालिका हद्दीतील विविध विकासकामांचा भूमिपूजन समारंभ बुधवारी राज्याचे उद्योगमंत्री तथा रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत व सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. या वेळी खासदार श्रीरंग बारणे, आमदार सर्वश्री प्रशांत ठाकूर, महेश बालदी, गोपीचंद पडळकर, राम शिंदे, ओबीसी नेते प्रकाश शेंडगे, माजी महापौर कविता चौतमोल, माजी उपमहापौर चारूशिला घरत, सीताताई पाटील, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, कोकण विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर, रायगडचे जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे आदी उपस्थित होते.** (छाया : अक्षय शार्दूल) **वृत्त उद्याच्या अंकात..**

# राज्यसभेसाठी भाजपकडून अशोक चव्हाण, मेधा कुलकर्णी, डॉ. अजित गोपछडे यांना उमेदवारी

## शिवसेनेकडून देवरा, तर राष्ट्रवादीकडून प्रफुल्ल पटेल यांची नावे

भाजप | शिवसेना | राष्ट्रवादी



**मुंबई : प्रतिनिधी**

भाजपने राज्यसभा उमेदवारांची नवी यादी जाहीर केली आहे. महाराष्ट्रातून अशोक चव्हाण, मेधा कुलकर्णी आणि अजित गोपछडे यांची उमेदवारी बुधवारी (दि. १४) जाहीर करण्यात आली आहे. भाजप तीन जागांवरच लढणार असल्याचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

देशभर लोकसभा निवडणुकांचा माहौल असताना केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्यसभेच्या महाराष्ट्रासह १५ राज्यांतील ५६ जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला. यानुसार, २७ फेब्रुवारी रोजी निवडणूक होणार आहे. उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची मुदत १५ फेब्रुवारीपर्यंत आहे. त्या पार्श्वभूमीवर भाजपकडून गुजरात आणि महाराष्ट्रासाठी सात उमेदवारांची यादी जाहीर केली. महाराष्ट्रातून भाजपचे केंद्रीय मंत्री नारायण राणे, केंद्रीय राज्यमंत्री व्ही. मुरलीधरन आणि प्रकाश जावडेकर हे तीन जण निवृत्त होत आहेत.

पक्षाच्या केंद्रीय संसदीय समितीने अशोक चव्हाण यांचा प्रदीर्घ राजकीय अनुभव लक्षात घेऊन राज्यसभा उमेदवारी देत त्यांचा सन्मान केला आहे. प्रा. मेधा कुलकर्णी, डॉ. अजित गोपछडे यांनी पक्षाच्या संघटनेसाठी अनेक वर्षे योगदान दिले आहे. प्रा. मेधा कुलकर्णी यांनी पुण्यात पक्षाच्या वाढीसाठी अनेक वर्षे काम केले आहे. पक्षाच्या महिला मोर्चाच्या राष्ट्रीय उपाध्यक्ष म्हणूनही त्या काम पहात आहेत. डॉ. गोपछडे यांनी आरोग्य क्षेत्रात मोठे काम केले आहे. या दोघांना उमेदवारी देऊन संघटनेसाठी काम करणाऱ्यांचा पक्ष आदर करते हेच सिद्ध झाले आहे. हे सर्व उमेदवार राज्यसभेत महाराष्ट्राचे प्रश्न मांडतील. राज्याचे केंद्राच्या पातळीवरील प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करतील, असे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

महायुतीच्या पाच उमेदवारांची घोषणा बुधवारी झाली असून भाजपने तीन तर शिवसेना एक व राष्ट्रवादी काँग्रेसकडून एका उमेदवाराचे नाव जाहीर करण्यात आले आहे. यामध्ये शिवसेनेकडून माजी खासदार व काँग्रेसमधून नुकतेच शिवसेनेत प्रवेश केलेल्या मिलिंद देवरा यांना संधी देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने प्रफुल्ल पटेल यांचे नाव जाहीर करण्यात आले आहे. सर्व तांत्रिक बाबी तपासून प्रफुल्ल पटेल यांना उमेदवारी देण्यात आल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी सांगितले. ही निवडणूक बिनविरोध होणार असल्याचा विश्वासही भाजप नेत्यांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

# मतदानाचा अचूक टक्का आता कळणार वेळेत

## ■ राज्यातील एक हजार २८१ केंद्रांवर सशक्त मोबाईल नेटवर्क

**पुणे : प्रतिनिधी**

मतदानाचा प्रत्यक्ष व अचूक आकडा वेळेत मिळावा यासाठी राज्यातील दुर्गम भागातील मतदान केंद्रांना आता सशक्त मोबाईल नेटवर्क मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार राज्यातील एक हजार २८१ मतदानकेंद्रांना दूरसंचार विभागाकडून मतदानावेळी मोबाईल नेटवर्क उपलब्ध करून दिले जाणार आहे. राज्यात सर्वाधिक दुर्गम मतदान केंद्र सिंधुदुर्ग जिल्ह्यात १६५ इतकी असून त्याखालोखाल नंदूरबारमध्ये १५० तर रत्नागिरीमध्ये १४८ मतदान केंद्र आहेत.




निवडणूक प्रक्रिया सध्या अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित बनली असून जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांसह निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना अनेक मोबाईल ॲपमधून माहिती मुख्य निवडणूक अधिकारी व केंद्रीय निवडणूक आयोगापर्यंत पोचवावी लागते, मात्र दुर्गम भागातील निवडणूक केंद्रांमध्ये मोबाईल नेटवर्क नसल्याने या भागातील माहिती वेळेत पोहचू शकत नाही. परिणामी मतदानाची प्रत्यक्ष टक्केवारी काढण्यासाठी अडचणी येतात. अशा मतदानकेंद्रावर मतदान यंत्रांमध्ये बिघाड झाल्यास त्याची माहितीही मिळत नाही. त्यामुळे तेथील समस्या सोडविण्यासाठी वेळ लागतो.

> **सशक्त मोबाईल नेटवर्कमुळे या मतदान केंद्रांवरील मतदानाची दर दोन तासांनी मिळणारी माहिती तातडीने उपलब्ध होऊ शकणार आहे. त्यामुळे मतदानाची टक्केवारी मतदान संपल्यानंतर तातडीने उपलब्ध होऊ शकणार आहे.**
> **-श्रीकांत देशपांडे, मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र**

यावर तोडगा म्हणून अशा दुर्गम मतदानकेंद्रांवर सशक्त मोबाईल नेटवर्क लावण्यासाठी मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी दूरसंचार विभागाला मोबाईल नेटवर्क सेवा पुरविण्याचे निर्देश दिले आहेत.

## पंतप्रधानांच्या हस्ते अबुधाबीमध्ये मंदिराचे उद्घाटन

**नवी दिल्ली** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते अबुधाबीमध्ये बुधवारी(दि.१४) श्री बोचासनवासी अक्षर पुरुषोत्तम स्वामीनारायण संस्था मंदिराचे उद्घाटन करण्यात आले. आखाती देशातील हे पहिले हिंदू मंदिर आहे. मंदिर परिसरात दाखल होताच महंत स्वामी महाराज यांच्यासह अनेक संतांनी पीएम मोदींचे स्वागत केले.

या वेळी पंतप्रधान मोदींनीही महंत स्वामी महाराजांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. उद्घाटनानंतर पीएम मोदी आरतीमध्ये सहभागी झाले, तसेच त्यांनी स्वामी महाराज यांच्यासोबत संपूर्ण मंदिराची पाहणी केली. विशेष म्हणजे, २०१८मध्ये पंतप्रधान मोदींच्याच हस्ते मंदिराची पायाभरणी झाली होती.

## निवडक

### मराठ्यांच्या मागण्यांसंदर्भात मंगळवारी विशेष अधिवेशन

**मुंबई** : मराठा समाजाच्या विविध मागण्यांसंदर्भात चर्चा करण्यासाठी येत्या मंगळवारी (दि. २०) विधिमंडळाचे एकदिवसीय विशेष अधिवेशन बोलवण्यात आले आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत त्यास मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

### बदलापूर-पनवेल मार्गावरील दोन्ही बोगद्यांचे काम पूर्ण

**नवी मुंबई** : नवी मुंबई आणि ठाणे या दोन भागांची सीमा असलेल्या बदलापूर आणि पनवेल या शहरांना जोडणाऱ्या बदलापूर-पनवेल मार्गाच्या दोन्ही बोगद्यांचे जवळपास चार किमी खोदकाम पूर्ण झाले आहे. १७ जुलै २०२५पर्यंत बोगद्याचे खोदकाम पूर्ण करत, त्यानंतर हा बोगदा नागरिकांच्या सेवेत आणण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. या बोगद्यामुळे नवी मुंबई आणि मुंबईचा प्रवास अवघ्या ४० मिनिटांवर येणार आहे.

# रायगडातील १४१ ग्रामपंचायतींचा कारभार प्रशासकांच्या हाती

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील १३० ग्रामपंचायतींचा कार्यकाळ संपल्याने तर ११ ग्रामपंचायतींवर अन्य कारणांमुळे प्रशासकांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील १४१ ग्रामपंचायतींचा कारभार प्रशासकांच्या हाती देण्यात आला आहे.



**तालुकानिहाय प्रशासक संख्या**
अलिबाग ३२, पेण १४, पनवेल ११, उरण ५, मुरूड ५, कर्जत १४, खालापूर ५, रोहा २१, तळा१८, म्हसळा १०, सुधागड ६, एकूण १४१.

अलिबाग तालुक्यातील ३२, पेण १४, पनवेल ११, उरण पाच, मुरूड पाच, कर्जत १४, खालापूर पाच, रोहा २१, तळा १८, सुधागड सहा, म्हसळा १० अशा एकूण १४१ ग्रामपंचायतींवर प्रशासकांची नेमणूक करण्यात आली आहे. माणगाव, म्हसळा, पोलादपूर, महाड या तालुक्यांमधील कोणत्याही ग्रामपंचायतींवर प्रशासकांची नेमणूक करण्यात आलेली नाही.

जिल्ह्यात सध्या जानेवारी आणि फेब्रुवारी महिन्यामध्ये मुदत संपणाऱ्या १३० ग्रामपंचायतींवर प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे. मुदत संपलेल्या सर्वाधिक ३२ ग्रामपंचायती अलिबाग तालुक्यातील आहेत. याव्यतिरिक्त अन्य ११ ग्रामपंचायतींवर वेगवेगळ्या कारणांमुळे प्रशासक नेमण्यात आले आहेत. त्यात पनवेलमधील तीन ग्रामपंचायतींचे विस्थापनामुळे, कर्जतमधील दोन ग्रामपंचायतींचे विभाजनामुळे तर एका ठिकाणी सरपंचांच्या राजीनाम्यामुळे, म्हसळ्यातील एक ग्रामपंचायत अल्पमतात आल्यामुळे, मुरूडमधील एका ग्रामपंचायतीमध्ये कार्यकारिणी अस्तित्वात न आल्याने, खालापूरमधील दोन ग्रामपंचायतींच्या विभाजनामुळे तर रोह्यातील एका ग्रामपंचायतीवर कलम ३९ अन्वये प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे.






**पनवेल : महापालिका हद्दीतील खारघर येथील रस्त्यांचे काँक्रीटीकरण करण्याच्या कामाचे भूमिपूजन बुधवारी आमदार प्रशांत ठाकूर व माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, समीर कदम, अमर उपाध्याय, माजी नगरसेवक गुरुनाथ गायकर, माजी नगरसेविका हर्षदा उपाध्याय, भाजप महिला मोर्चाध्यक्ष साधना पवार, विनोद ठाकूर, अक्षय लोखंडे, प्रवीण बेरा, सचिन वासकर, रमेश खडकर, अश्विनी भुवड, नंदा पानसरे, नूतन सिंग, दीपक ठाकूर उपस्थित होते.**



# मराठी बाणा, आगरी नृत्याविष्कारांनी रायगडकर मंत्रमुग्ध

## महासंस्कृती महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद



**रायगड : रामप्रहर वृत्त**

कोकणातील पारंपरिक लोककला त्याचबरोबर कलावंताचा गीत, संगीत, मराठी सण उत्सव परपंरांवर आधारित ’मराठी बाणा’ कलाकृती तसेच स्थानिक कलाकारांचा कोळी संस्कृती दर्शविणाऱ्या कार्यक्रमाने मंगळवारी रायगडकर मंत्रमुग्ध झाले. या दोन्ही कार्यक्रमाना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय व रायगड जिल्हा प्रशासनाच्या वतीने अलिबाग येथील पोलीस परेड मैदानावर रायगड महासंस्कृती महोत्सवांतर्गत अशोक हांडे यांचे लेखन आणि संकल्पना असणारा मराठी बाणा हा ७० एमएम मराठी कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमास जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड, जिल्हा न्यायाधीश भिलारे, जिल्हा न्यायाधीश मणेर, विधी सेवा प्राधिकरण सचिव शिंदे, उपवनसंरक्षक अमोल शिंदे यांसह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात स्थानिक कलाकारांचा कोळी संस्कृती दर्शविणाऱ्या कार्यक्रमात कोळी नृत्य, आगरी नृत्याच्या माध्यमातून गीत, संगीत आणि नृत्याविष्कारातून गीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली. या महोत्सवात विविध प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. पेण येथील गणेशमूर्तींचे प्रदर्शन, शिवकालीन शस्त्र प्रदर्शन, शिवदुर्ग प्रदर्शन, स्थानिक बचत गटांनी तयार केलेल्या उत्पादन दालन तसेच खाद्यपदार्थ दालन तसेच कृषी प्रक्रिया आधारित विविध दालन या महोत्सवात आहेत.

## शेलू येथे उद्या नमो चषक बैलगाडा स्पर्धा

**कर्जत : रामप्रहर वृत्त**

भाजप युवा मोर्चा व भाजप कर्जत खालापूर विधानसभा निवडणूक प्रमुख किरण ठाकरे यांच्या पुढाकारातून नमो चषकाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये नमो चषक क्रिकेट स्पर्धा, नमो चषक कब्बडी स्पर्धा, फुटबॉल, रांगोळी, कॅरम, हॉलिबॉल अशा विविध स्पर्धा विनामूल्य करण्यात आल्या व त्यास उत्तम प्रतिसादसुद्धा पहायला मिळाला. आता कर्जत तालुक्यातील शेलू येथील मैदानावर नमो बैलगाडा स्पर्धेचे आयोजन शुक्रवारी (दि. १६) करण्यात आहे.

मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर व माजी आमदार सुरेश लाड यांच्या मार्गदर्शनाखाली व कर्जत खालापूर विधानसभा निवडणूक प्रमुख किरण ठाकरे यांच्या पुढाकारातून नमो बैलगाडा स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेसाठी ना. रवींद्र चव्हाण, आमदार महेश लांडगे, नगरसेवक तथा महाराष्ट्र बैलगाडा संघटना अध्यक्ष संदीप माळी, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी जि. प. सभापती नरेश पाटील आदी उपस्थित राहणार आहेत.

# मुंबईकरांचे प्रश्न मार्गी लावल्याबद्दल धन्यवाद देवेंद्रजी कार्यक्रम

## भाजप आमदार प्रवीण दरेकर यांची माहिती

**मुंबई : प्रतिनिधी**



मुंबईकरांचे गृहनिर्माण क्षेत्रातील अनेक प्रश्न मार्गी लावल्याबद्दल भाजप, मुंबई जिल्हा सहकारी गृहनिर्माण महासंघ आणि मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांच्या वतीने २० फेब्रुवारी रोजी ’धन्यवाद देवेंद्रजी’ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती मुंबई बँकेचे अध्यक्ष व भाजप आमदार प्रवीण दरेकर यांनी बुधवारी (दि.१४) दिली. भाजप प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

आमदार प्रसाद लाड, प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, भाजपा प्रदेश प्रवक्ते आसिफ भामला आदी या वेळी उपस्थित होते. काळाचौकी अभ्युदय नगर येथील भगतसिंग मैदानावर हा कार्यक्रम होणार आहे. आमदार दरेकर यांनी सांगितले की, लाखो मुंबईकरांचे गृहनिर्माण क्षेत्रातील प्रश्न सोडविण्यासाठी गोरेगाव येथे गृहनिर्माण संस्थांच्या सहकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत करण्यात आलेल्या अनेक मागण्या मान्य करीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईकरांना दिलासा दिला आहे. याबद्दल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाला गृहनिर्माण मंत्री अतुल सावे, मुंबई उपनगर पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, मुंबई भाजप अध्यक्ष आमदार आशिष शेलार, मुंबई जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष सिद्धार्थ कांबळे, माजी आमदार बाळा नांदगावकर, हौसिंग फेडरेशनचे अध्यक्ष प्रकाश दरेकर आदी उपस्थित राहणार आहेत.

# राज्यातील प्रत्येक शाळेत राबविणार 'हॅप्पी सॅटर्डे'

## शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांची घोषणा

**सावंतवाडी : प्रतिनिधी**

शालेय शिक्षण घेताना मुले खुश राहावीत यासाठी राज्यातील प्रत्येक शाळेत हॅप्पी सॅटर्डे ही संकल्पना राबविण्यात येणार असल्याची घोषणा राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी केली.

या संकल्पने अंतर्गत मुलांना अभ्यास वगळून दर शनिवारी संगीत, नाट्य, कला यांचे शिक्षणतज्ज्ञ शिक्षकांच्या माध्यमातून देण्यात येणार आहे. सावंतवाडीत राज्यस्तरीय बालवैज्ञानिक प्रदर्शन समारोप कार्यक्रमात मुंबई येथून ते ऑनलाईन बोलत होते. या वेळी एनसीआरटीचे प्राध्यापक टी.पी शर्मा, राधा अतकरी, प्रदीप कुडाळकर, वासुदेव नाईक, अच्युत भोसले, कल्पना बोडके, म.ल. देसाई, कृष्णकुमार पाटील, डॉ. राजेंद्र कांबळे, राजकुमार अवसरे, प्रवीण राठोड, प्रियांका देसाई, कैलास चव्हाण, अवधूत मालणकर, महेश चोथे,



डॉ. आचरेकर, लक्ष्मीकांत बानते, जयंत भगत, प्रसाद महाले आदी उपस्थित होते.

मंत्री केसरकर म्हणाले, राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनाला मुलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. त्यांनी सादर केलेल्या प्रतिकृती कौतुकास्पद होत्या. विज्ञानाची कास धरून विद्यार्थ्यांनी यापुढे आपली वाटचाल करावी, असे आवाहन ही त्यांनी या वेळी केले. विद्यार्थ्यांना सक्षम करण्याचे काम शासनाच्या माध्यमातून करण्यात येत आहे. येणाऱ्या काळात मुलांना शाळेबद्दल आकर्षण वाढावे यासाठी हॅप्पी सॅटर्डे ही संकल्पना राबविण्यात येणार आहे.

या संकल्पनेत अंतर्गत दर शनिवारी या ठिकाणी विद्यार्थ्यांना अभ्यास वगळून संगीत, नाट्य, कला आदी क्षेत्रातील प्रशिक्षण तज्ज्ञ मार्गदर्शकांच्या माध्यमातून दिले जाणार आहे. आगामी काळात पहिली ते दहावी पर्यंत विद्यार्थ्यांना कृषी शिक्षण सक्तीचे करण्यात येणार आहे. अन्नधान्यात भारत देश स्वयंपूर्ण व्हावा हा उद्देश त्यामध्ये ठेवण्यात आला आहे.

कोरोना काळात सर्व देश अन्नधान्याच्या बाबतीत कमी पडले, परंतु भारत देश केवळ शेतकऱ्यांमुळे अडचणीत आला नाही हे गौरवास्पद आहे. ही बाब लक्षात आल्यामुळे यापुढे कृषी हा विषय सक्तीचा करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे ही मंत्री केसरकर यांनी केले आहे.

# पोलादपूरच्या कशेडी घाटामध्ये २४ तासांमध्ये चार अपघात

**पोलादपूर : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील पोलादपूर तालुक्यातील कशेडी घाटामध्ये गेल्या २४ तासांमध्ये चार अपघात झाले आहेत.

मंगळवारी सकाळी ११ वाजता युनिस आगा यांनी फिर्याद दिल्यानुसार त्यांच्या ताब्यातील बस (जीए०५ एफ ००१ टीसी ००२७) ही गोवा ते पनवेल अशी घेऊन जात असताना भोगाव गावाच्या हद्दीमध्ये मागील बाजूने भरधाव वेगाने येणाऱ्या एसटी बस (एमएच २० बीएल ४०४८)



सिध्दार्थ गंगाधर बडे हा रत्नागिरी ते वसई चालवित रस्त्याची पर्वा न करता गोवा पनवेल बसला धडकला. याप्रकरणी पोलादपूर पोलीस ठाण्यात पंचनामा करून एसटी बसचालक सिध्दार्थ बडे याच्याविरूध्द गुन्हा दाखल केला. दुपारी चोळई गावाच्या हद्दीमध्ये कशेडी घाटाच्या तीव्र वळण उतारावर मशिनरी घेऊन जाणारा ट्रक (जीजे १७ एक्सएक्स ०८७१) चालकाचे वाहनावरील नियंत्रण ढळल्याने कलंडला. या वेळी रस्त्याच्या संरक्षक कठडयालगत हा ट्रक क्लिनरसाईडला कलंडला.

चोळई येथे मंगळवारी कलंडलेल्या ट्रकपासून काही अंतरावर बुधवारी सकाळी एक टँकर रस्त्याच्या संरक्षक भिंतीलगत कलंडला. काही तासातच आणखी दोन ट्रक सकाळी कलंडलेल्या टँकरच्या मागील भागात कलंडल्याने चोळई येथील कशेडी घाटातील मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरणानंतर झालेल्या अपघातांची संख्या चार झाल्याची माहिती स्थानिकांनी दिली.



उरण : माघी गणेशोत्सव निमित्त भाजप संयुक्त ट्रान्सपोर्ट संघटनेचे रायगड जिल्हा सरचिटणीस सुदेश पाटील यांच्या कोप्रोली येथील निवासस्थानी विराजमान गणेशमूर्ती व दर्शन घेताना न्हावा शेवा बंदर विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त विशाल वसंत नेहूल, सुदेश पाटील व त्यांचे कुटुंबिय व मित्र परिवार.



उरण : माघी गणेशोत्सव निमित्त कामगार नेते सुधीर घरत यांच्या करंजा रोड येथील निवासस्थानी विराजमान गणेशमूर्ती व त्यांचे कुटुंबीय.

# राज्याचे केंद्रीय स्तरावरील प्रश्न महायुतीचे नूतन खासदार सोडवतील

## भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा विश्वास

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अशोक चव्हाण, प्रा. मेधा कुलकर्णी आणि डॉ. अजित गोपछडे हे भारतीय जनता पार्टीचे तिन्ही उमेदवार राज्याचे प्रश्न केंद्रीय स्तरावर मांडून ते सोडविण्यासाठी प्रयत्न करतील, असा विश्वास भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुधवारी व्यक्त केला. भाजप प्रदेश कार्यालयात बावनकुळे पत्रकारांशी बोलत होते. या वेळी खासदार संजय काका पाटील, प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक, प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन उपस्थित होते.

बावनकुळे म्हणाले की, पक्षाच्या केंद्रीय संसदीय समितीने अशोक चव्हाण यांचा प्रदीर्घ राजकीय अनुभव लक्षात घेऊन राज्यसभा उमेदवारी देत त्यांचा सन्मान केला आहे. प्रा. मेधा कुलकर्णी, डॉ. अजित गोपछडे यांनी पक्षाच्या संघटनेसाठी अनेक वर्षे योगदान दिले आहे.

हे सर्व उमेदवार राज्यसभेत महाराष्ट्राचे प्रश्न मांडतील. राज्याचे केंद्राच्या पातळीवरील प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करतील. हे तिघेही उत्कृष्ट खासदार म्हणून नावलौकिक प्राप्त करतील, असा मला विश्वास आहे, असेही बावनकुळे यांनी नमूद केले.




# नवी मुंबईत जंतनाशक दिन

**नवी मुंबई : बातमीदार**

सुदृढ आरोग्यासाठी जंतनाशक गोळी हि संजीवनी असून राष्ट्रीय जंतनाशक दिन मोहीम वर्षातून दोन वेळा राबविण्यात येते. यंदा हि मोहीम नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्रात राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार राष्ट्रीय जंतनाशक मोहीम मंगळवार (दि. १३) व मॉप अप दिन मंगळवार (दि. २०) राबविण्यात येणार आहे.

यामध्ये १ ते १९ वर्षे वयोगटातील मुला-मुलींना वयोगटानुसार निश्चित १ ते १९ वर्षापर्यंतच्या सर्व बालकांना जंतनाशक गोळी देऊन कृमीदोषामुळे होणाऱ्या रक्तक्षय व कुपोषणापासून प्रतिबंध करून उत्तम आरोग्य ठेवणे व पोषण स्थिती आणि शिक्षणाचा दर्जा उंचावणे महत्त्वाचे आहे, असे आवाहन महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या वतीने करण्यात येत आहे.

जंताचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जंत नाशक गोळी घेण्याबरोबरच हात स्वच्छ धुणे, शौचालयाचा वापर करणे, भाज्या व फळे स्वच्छ धुवून खाणे, नखे नियामित कापणे व स्वच्छ ठेवणे ही खबरदारी घेणे ही आवश्यक आहे.

# चौक ग्रंथालयास नवे पुस्तक भेट



**खोपोली : प्रतिनिधी**

ज्येष्ठ लेखक सुखलाल चौधरी यांनी नुकतेच चौक येथील ग्रंथालयात भेट देऊन त्यांच्या भाकरीचा तुकडा या नव्या पुस्तकाचे नुकतेच प्रकाशन झाले, त्याची एक प्रत त्यांनी चौक ग्रंथालयास दिली.

या वेळी ग्रंथालयात वाचकांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे, त्यासाठी ग्रंथालयाच्या पदाधिकाऱ्यांनी त्याचप्रमाणे शासनाने यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन ज्येष्ठ लेखक सुखलाल चौधरी यांनी केले आहे.

ग्रंथालयाचे अध्यक्ष सुरेश वत्सराज त्याचप्रमाणे कार्यकारणी सदस्य अशोक चौधरी व ग्रंथपाल व इतर मान्यवर उपस्थित होते. चौधरी हे निवृत्त गटशिक्षण अधिकारी आहेत. वयाच्या ७५व्या वर्षीही त्यांचे लिखाण नेहमी सुरू असते. शासनाने अशा लेखकाची दखल घ्यावी, असे या वेळी मान्यवरांनी सांगितले.

# कर्जत, खालापूरमधील अनेक राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये दाखल

**कर्जत : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील ग्रामपंचायत खरीवली, नंदनपाडा,मानकिवली, जांभिवली, डोलवली आदी परिसरातील विविध पक्षातील शेकडो कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर विश्वास दाखवत पक्षप्रवेश केला आहे.

खालापूर तालुक्यातील पक्षप्रवेश हे अंकित साखरे, संतोष बैलमारे, कुमार गौरव दिसले यांच्या प्रयत्नातून झाले आहेत. तसेच कर्जत तालुक्यातील माणगाव तर्फे वरेडी ग्रामपंचायत मधील बेकरेवाडी येथील शिंदे गटातील कार्यकर्ते, ग्रामपंचायत कळंब, कर्जत नगरपरिषद मधील सुयोग नगर येथील कार्यकर्ते, मनसे पदाधिकारी योगेश सुर्वे, बिलाल आढाल खाटीक आळी आदी कार्यकर्त्यांनी पक्षप्रवेश केला.





या वेळी व्यासपीठावर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे यांसह जिल्हा प्रदेश प्रतिनिधी व शहराध्यक्ष भगवान भोईर, सरचिटणीस अशोक भोपतराव, जिल्हा उपाध्यक्ष एकनाथ धुळे, शरद कदम, जिल्हा युवक अध्यक्ष अंकित साखरे, कर्जत तालुकाध्यक्ष भगवान चंचे, खालापूर तालुकाध्यक्ष संतोष बैलमारे, पंचायत समिती माजी सदस्य दीपक श्रीखंडे, प्रकाश पालकर, युवक तालुकाध्यक्ष अ‍ॅड. स्वप्नील पालकर, शिवाजी खारीक, इब्राहीम करंजीकर, विधानसभा महिला अध्यक्ष अ‍ॅड. पूजा सुर्वे, महिला तालुकाध्यक्ष अ‍ॅड. रंजना धुळे, महिला शहराध्यक्ष मधुरा चंदन आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# महाविद्यालयील विद्यार्थ्यांसाठी लोगो डिझायनिंग स्पर्धा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात बुधवारी (दि. १४) सकाळी ११ वाजता स्वर्गीय जनार्दन भगत साहेब यांच्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर व्यवस्थापन संघटने तर्फे आंतरमहाविद्यालयीन लोगो डिझायनिंग स्पर्धचे आयोजन केले होते.




या स्पर्धेमध्ये नवी मुंबई मधील वेगवेगळ्या महाविद्यालयाने सहभाग घेतला होता त्यामध्ये एनएमआयएमएस महाविद्यालय, चांगू काना ठाकूर महाविद्यालय न्यू पनवेल, विकास महाविद्यालय यांचा प्रामुख्याने समावेश होता. लोगो डिझायनिंग स्पर्धेसाठी स्वर्गीय जनादन भगत साहेब यांचे जीवन व कार्य हा विषय विद्यार्थी व विद्यार्थ्यांनींना देण्यात आला होता त्या अनुषंगाने सर्व स्पर्धकांनी त्यांच्या कलागुणांचे सादरीकरण करत चांगल्या पद्धतीने लोगो डिझाईन केले होते.

प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी या स्पर्धेसाठी महाविद्यालयातील सर्व शाखेतील विद्यार्थी व विद्यार्थिनींना प्रोत्साहन दिले व सर्व विजेत्यांचे अभिनंदन केले. या स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला त्यामध्ये प्रियल मेहता हिने प्रथम क्रमांक, आशिष रोडरीगस याने द्वितीय व स्नेहा कोळी हिने तृतीय क्रमांक पटकाविला. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून रंजना राणा व नमिता आखूरे यांनी कामकाज पाहिले.

या स्पर्धचे आयोजन प्रा. डॉ. रीत ठुले विभाग प्रमुख व्यवसाय व्यवस्थापन व शिक्षण विभाग यांनी केली तसेच प्रा. रेवन शिंदे, प्रा. स्नेहा नाईक, प्रा. दिव्या निंबोत्री, प्रा. अंकिता जागिड, प्रा. मीरा पटेल व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

# उमरोली ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी भाजपच्या शुभांगी मढवी बिनविरोध

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उमरोली ग्राम पंचायतीच्या सरपंचपदी भाजपच्या शुभांगी नरेश मढवी यांची बुधवारी (दि. १४) बिनविरोध निवड करण्यात आली.

उमरोली ग्रामपंचायतीच्या सरपंच अलका तांडेल यांनी पदाचा राजीनामा दिल्यानंतर रिक्त झालेल्या जागेसाठी बुधवारी मतदान घेण्यात आले. सरपंच पदासाठी शुभांगी मढवी यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांना सरपंच म्हणून निवडणूक निर्णय अधिकारी सानिका पाटील आणि ग्रामविकास अधिकारी भोलानाथ जगताप यांनी घोषित केले. उमरोली ग्रामपंचायत एकेकाळी शेकापचा बालेकिल्ला होती, पण आमदार प्रशांत ठाकूर यांच्या कार्यपद्धतीने प्रभावी होऊन



आता ही पंचायत भाजपच्या ताब्यात आहे. या वेळी सरपंच शुभांगी मढवी यांनी, पंचायतीचा विकास करत असताना आमदार प्रशांत ठाकूर यांचे मार्गदर्शन घेत, त्यांच्या मार्फत विविध निधी आणण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू, असे सांगितले.

मढवी यांच्या निवडीबद्दल आमदार प्रशांत ठाकूर, भाजप तालुका अध्यक्ष अरूणशेठ भगत, तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, एकनाथ देशेकर, उपसरपंच शांताराम पोपेटा, सुनील पाटील नेरे विभागीय अध्यक्ष भाजप, पळस्पे माजी उपसरपंच अ‍ॅड. विकास भगत यांच्यासह नरेश मढवी, नारायण मढवी नारायण माळी, नामदेव मढवी, दशरथ मढवी, सुरेश माळी, अविनाश चौधरी, राजेश मढवी, चंद्रकांत माळी, अशोक माळी, संतोष पाटील आदींसह सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते.

# शिष्यवृत्ती परीक्षेत ऋग्वेद बुळू प्रथम

**मुरूड : प्रतिनिधी**



महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने आयोजित केलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल शिष्यवृत्ती योजना परीक्षेत मुरूड येथील सर एस.ए. हायस्कूलचा विद्यार्थी ऋग्वेद कल्पेश बुळू याने यश प्राप्त केले आहे. ऋग्वेदने ७२ टक्के गुण मिळवून मुरूड तालुक्यात प्रथम प्रथम येण्याचा बहुमान मिळवला.

याबद्दल त्याचे तहसीलदार रोहन शिंदे, गटशिक्षण अधिकारी सुनील गवळी, गटविकास अधिकारी गजानन लेंडी, जंजिरा विद्या मंडळाचे अध्यक्ष सुधाकर दांडेकर, मुख्याध्यापक सरोज राणे, गणित शिक्षक संदेश चोरघे यांनी अभिनंदन केले.

# गोखले एज्युकेशन सोसायटी हायस्कूलमध्ये व्याख्यान

## 'पर्यावरण सेवा'द्वारे पनवेल मनपाचा उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत पर्यावरण संवर्धन व संरक्षण याचे महत्त्व शालेय, स्तरावर बाल वयात विद्यार्थ्यांमध्ये प्रत्यक्ष कृतीद्वारे बिंबवण्यासाठी शासन निर्णयाद्वारे राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये पर्यावरण सेवा योजना पनवेल महापालिकेच्या वतीने राबविण्यात येत आहे. या अंतर्गत बुधवारी (दि. १४) गोखले एज्युकेशन सोसायटी हायस्कूल खारघर येथे महापालिकेच्यावतीने 'आकाश' या विषयावरती व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.



माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत पर्यावरणाचे महत्व शालेय विद्यार्थ्यांना समजावे यासाठी पर्यावरण सेवा योजना महापालिकेच्यावतीने पालिका कार्यक्षेत्रातील २५ माध्यमिक विद्यालयांमध्ये राबविण्यात येत आहे. या योजनेची माहिती देण्यासाठी नुकतीच या २५ माध्यमिक शाळांच्या प्रतिनिधींची बैठक उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या अध्यक्षतेखाली महापालिका मुख्यालयात घेण्यात आली होती.

या पर्यावरण सेवा योजनांतर्गत आकाश, जल, वायू, भूमी, अग्नि या माझी वसुंधरा अभियानातील महत्त्वाच्या घटकांनूसार कृती कार्यक्रम, शिबिरे,व्याख्याने, वक्तृत्व स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, वृक्षारोपण, प्रश्नमंजूषांचे आयोजन विद्यालयांमध्ये करण्यात येत आहेत.

पर्यावरण सेवा योजनेंतर्गत आज गोखले एकज्युकेशन सोसायटी हायस्कूलमध्ये या योजनेची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. माझी वसुंधरा अंतर्गत 'आकाश' या विषयांतर्गत पर्यावरणीय सुधारणा यावरती व्याख्यान देण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांनी झाडे दत्तक घेऊन त्यांना वाढविण्याविषयी सांगण्यात आले. याबरोबरच पर्यावरण संवर्धनावर आधारित व्हिडीओ विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले.

या वेळी मुख्याध्यापक एन एम.पाटील, पर्यावरण सेवा योजना कार्यक्रम समन्वयक गौरी शिंदे, इयत्ता सहावी ते आठवीचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याच पध्दतीने महापालिकेच्या वतीने विविध शाळांमध्ये कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

# खारघर-तुर्भे अवघ्या दहा मिनिटांत

## लिंक रोडच्या कामाबाबत कार्यादेश




**पनवेल : वार्ताहर**

अवघ्या दहा मिनिटांत पार करता येईल असा खारघर-तुर्भे लिंक रोड (केटीएलआर)च्या कामास लवकरच सुरुवात होणार असून यासंदर्भातील कार्यादेश संबंधित कंत्राटदाराला दिले आहेत. नुकतेच हे काम कंत्राटदार कंपनीस २०९९ कोटी रुपयांना करण्याचे कार्यादेश दिले आहेत. हा मार्ग सुरू झाल्यानंतर खारघर तसेच तळोजा येथील रहिवाशांची मोठी सोय होणार आहे.

मागील अनेक वर्षांपासून हा मार्ग कधी बांधला जाईल याकडे नवी मुंबईसह खारघर आणि तळोजावासियांचे लक्ष लागले होते. 'केटीएलआर' मार्गाची एकूण लांबी ५.४९ किलोमीटर असून यामध्ये खारघर वसाहत आणि तुर्भे औद्योगिक वसाहत या दरम्यानच्या पारसिक डोंगररांगा पोखरून १.७६ किलोमीटरचा भुयारी मार्ग बांधण्यात येणार आहे. केटीएलआरमुळे तुर्भे, नेरुळ, जुईनगर, वाशी या परिसरांतून खारघरमध्ये अवघ्या १० मिनिटांत पोहोचणे शक्य होऊ शकेल. या मार्गिकेसाठी ऋत्विक प्रोजेक्ट्स व एव्हरास्कॉन (जेव्ही) या कंपनीची निवड मागील वर्षी सप्टेंबर महिन्यात सिडको मंडळाच्या संचालकांच्या बैठकीत करण्यात आली होती. केटीएलआर हा मार्ग शीव-पनवेल महामार्गावरील जुईनगर रेल्वे स्थानकासमोरून सुरू होऊन खारघरच्या गुरुद्वारा आणि सेंट्रल पार्क येथील जंक्शन तसेच खारघर कॉर्पोरेट पार्क या परिसराला जोडला जाईल, अशी माहिती मिळत असून हा मार्ग बांधण्यासाठी कंत्राटदार कंपनीला चार वर्षांचा कालावधी लागणार आहे.

केटीएलआरमुळे शीव-पनवेल महामार्गावरील वाहतूक कोंडी कमी होईल. तसेच या मार्गामुळे खारघर उपनगरातील वाहनचालकांना वसाहतीमध्ये प्रवेश करण्यासाठी तिसरे प्रवेशव्दार मिळणार आहे. सध्या वसाहतीमध्ये सकाळी ९ ते १० या वेळेत आणि सायंकाळी ७ ते ८ या वेळेत उत्सव चौक ते सेंट्रल पार्क चौकापर्यंत वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो.

### रहिवाश्यांचा वाहतूक कोंडीमुक्त होणार प्रवास

केटीएलआर सुरू झाल्यास खारघरवासियांसोबत तळोजातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. केटीएलआरवर ये-जा करण्यासाठी चार वेगवेगळ्या मार्गिका असतील. यामुळे खारघर येथील व्यावसायिक कॉर्पोरेट पार्क, गोल्फ कोर्स, फुटबॉल ग्राऊंड, सेंट्रल पार्क यांपर्यंत मुंबई व नवी मुंबईतील इतर उपनगरातील रहिवाशांना काही मिनिटांत विना कोंडीचा प्रवास करून पोहचता येईल.

### दोन्ही मार्गावर ताण

खारघरमध्ये प्रवेशासाठी बेलापूर भारती विद्यापीठ मार्गे आणि शीव-पनवेलहून थेट प्रवेश करण्यासाठी दोन मार्ग आहेत. खारघर आणि तळोजा या दोन्ही उपनगरांमध्ये जाण्यासाठी हाच मार्ग असल्याने या मार्गावरील ताण वाढला आहे.

# तळोजा परिसरातील पाच बेपत्ता मुली दिल्लीत सापडल्या

**पनवेल : वार्ताहर**

आईवडिलांच्या त्रासाला कंटाळून तसेच घरातील वातावरण आवडत नसल्याने तळोजा भागात राहणाऱ्या ५ ते १६ वर्षे वयोगटातील पाच मुली घर सोडून गेल्या होत्या. नवी मुंबई पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने या मुलींचा शोध घेऊन त्यांना दिल्लीतील गुडगाव येथून ताब्यात घेतले आहे. या पाचही मुलींचे अपहरण झाले असावे, असा अंदाज व्यक्त करण्यात आल्याने चिंता व्यक्त करण्यात येत होती.

तळोजा परिसरातून ५ ते १६ वर्षे वयोगटातील पाच मुली एका वेळेस बेपत्ता झाल्या होत्या. त्यांच्या पालकांनी सगळीकडे शोधाशोध केल्यानंतर तळोजा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पृथ्वीराज घोरपडे, गुन्हे शाखा युनिट-२ उमेश गवळी, युनिट-३चे पोलीस निरीक्षक मुलाणी तसेच इतर अधिकारी व अंमलदार यांची वेगवेगळी तपास पथके तयार केली. या गुन्ह्यातील अपहृत पाचही मुलींचा तांत्रिक तपासाद्वारे शोध घेण्यात येत होता. त्या पुराव्यांच्या आधारे पाच पैकी सोळा वर्षीय मुलगी गुडगांव येथे असल्याचे आढळले. तसेच त्या पाचही मुली एकमेकींच्या सोबत असल्याचेही स्पष्ट झाले होते. पोलिसांनी अपहृत मुलींपैकी चौदा वर्षीय मुलीचा मानलेला भाऊ आरिफ याला संपर्क साधला. त्यानंतर पाचही मुलींना ताब्यात घेतले. पोलिसांनी चारही मुलींना विश्वासात घेऊन चौकशी केली. त्यावेळी त्यांचे अपहरण झाले नसल्याचे तपासामध्ये आढळून आले.

या पाच मुलींपैकी तिघी जणींनी आपण बहिणी, आईवडिलांच्या त्रासाला कंटाळून तसेच इतर दोघी बहिणी त्यांच्या घरातील वातावरण ठीक नसल्याने घर सोडून गेल्याचे सांगितले. या मुलींना पुढील कार्यवाहीसाठी तळोजा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.



**नवीन पनवेल : सेक्टर १३ ए टाईप येथील शिवश्री साई मंदिराच्या १३व्या वर्धापनदिनानिमित्त साई भंडारा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमांना भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट दिली. या वेळी त्यांचे माजी नगराध्यक्ष सुनील घरत यांनी स्वागत केले. सोबत रवी नाईक व कार्यकर्ते उपस्थित होते.**



**कामोठे : सेक्टर ११मध्ये जय मल्हार डेली मार्केटचे उद्घाटन माजी नगरसेवक दिलीप पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी विजय चिपळेकर, माजी नगरसेविका हेमलता गोवारी, गोपीनाथ गोवारी, गोपीनाथ भगत, गोपीनाथ डाया गोवारी, सुनील भगत आदी उपस्थित होते.**

## बांधकाम साहित्य चोरणारा ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**




घराच्या बांधकामासाठी आणलेले साहित्य चोरणाऱ्या आरोपीला पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेऊन घरफोडीच्या गुन्हा उघडकीस आणला आहे.

पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत काळूंद्रे गावामधील बंद घरामधून खिडकीद्वारे प्रवेश करून घरातील बांधकामासाठी आणलेल्या साहित्यापैकी एकूण ३७ हजार ८०० रुपये किमतीची वायर अज्ञात चोराने चोरली होती. या बाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली होती. या गुन्ह्याच्या तपासामध्ये सदरचा गुन्हा हा काळूंद्रे गावातील मनोज कमलाकर कातकरी याने केला असल्याची खात्रीलायक माहिती तपास पथकास भेटली. या माहितीच्या आधारे मनोज कमलाकर कातकरी याला ताब्यात घेऊन घरफोडीच्या गुन्हा उघडकीस आणला आहे.

ही कामगिरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक अभय शिंदे, हवालदार नितीन वाघमारे, परेश म्हात्रे, नाईक रवींद्र पारधी, विनोद देशमुख, शिपाई नितीन कांबळे, प्रसाद घरत, साईनाथ मोकळ यांनी केली आहे.

## मोबाईल दुकानातील चोरी उघडकीस

**पनवेल : वार्ताहर**

खारघर वसाहतीमधील एका मोबाईलच्या दुकानांमध्ये करण्यात आलेली घरफोडी गुन्हे शाखा कक्ष १च्या पथकाने सखोल तपास करून घरफोडी उघडकीस आणली आहे व त्यांच्याकडून घरफोडीसाठी लागणारे सामान हस्तगत केले आहेत.

खारघर वसाहतीमधील एका मोबाईलच्या दुकानात अज्ञात चोरट्याने घरफोडी करून मोठ्या प्रमाणात मुद्देमाल चोरून नेला होता. याबाबतचा तपास गुन्हे शाखा कक्ष १ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक आबासाहेब पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निरीक्षक गंगाधर देवडे, निलेश बनकर, उपनिरीक्षक नरेंद्र पाटील, विशाल सावरकर, सुमंत बांगर, बालाजी चव्हाण, दीपक पाटील आदींचे पथक घटनास्थळांच्या सीसीटीव्हीच्या माध्यमातून व गोपनीय बातमीदाराद्वारे त्यांनी संशयित आरोपींची माहिती मिळवली.

यानुसार गुन्ह्यात वापरलेली रिक्षा हस्तगत करून येथील आरोपी सतीश तपासे (वय २०), ओमकार बाबर (वय २०) व शफी शेख (वय २३) अश्या तीन आरोपींना ताब्यात घेतले आहे. त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली असून त्यांच्या दोन साथीदारांचा शोध पोलिसांचे पथक करीत आहेत. दरम्यान, याच आरोपींची रबाळे येथेसुद्धा गुन्हा केल्याची कबुली दिली आहे.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयाचे शॉर्ट फिल्म मेकिंग स्पर्धेमध्ये यश

**खारघर : रामप्रहर वृत्त**



जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयाने बुधवारी (दि. १४) स्वर्गीय जनार्दन भगत साहेब यांच्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर चांगू काना ठाकूर महाविद्यालयाने आयोजित केलेल्या आंतरमहाविद्यालयीन शॉर्ट फिल्म मेकिंग स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी बाजी मारली आहे.

रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वेगवेगळे शैक्षणिक, सामाजिक, व सांस्कृतिक, क्रीडा यासारखे नाविन्यपूर्ण उपक्रमांमध्ये सहभाग घेत असते त्याचाच एक भाग म्हणून महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी या आंतरमहाविद्यालयीन शॉर्ट फिल्म मेकिंग स्पर्धेमध्ये भाग घेऊन फर्स्ट इयर या लघु चित्रपटाला द्वितीय क्रमांक मिळाला तसेच सावित्री या लघु चित्रपटाला तृतीय क्रमांक मिळाला या दोन्हीही लघु चित्रपटांमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी वेगवेगळ्या भूमिका साकारल्या होत्या. प्रस्तुत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. डॉ. दीपिका हसीजा, प्रा. राहुल कांबळे, प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. शिल्पा पाटील, प्रा. अंकिता जागीड, प्रा. राजश्री म्हात्रे व प्रा. तनुजा सुमन, या सर्वांचे विद्यार्थ्यांना स्पर्धेसाठी मार्गदर्शन लाभले.

संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन चेअरमन वाय. टी. देशमुख, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे यांनी या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.




**पनवेल : प्रभाग समिती अ खारघर येथील बेलपाडा अंडरपास ते एनआयएफटी महाविद्यालयापर्यंत रस्त्याचे काँक्रीटीकरण व अनुषांगिक कामांचे भूमिपूजन बुधवारी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, शत्रुघ्न माळी, गुरुनाथ गायकर, समीर कदम, अमर उपाध्याय, महिला मोर्चाच्या साधना पवार आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

## खारघरमध्ये ट्रेडरला ८९ लाखांचा गंडा

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरात फसवणुकीच्या घटना वाढल्या आहेत. ट्रेडिंगच्या बहाण्याने एका ट्रेडर्सची ८९ लाखांची फसवणूक झाली आहे. या प्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

खारघर येथील एक ट्रेडर सोबत हा प्रकार घडला आहे. ते स्टॉक मार्केटमध्ये ट्रेडिंगचा व्यवसाय करतात. त्यांना एका व्यक्तीने आयपीओमध्ये रक्कम गुंतवून अधिक नफा मिळवण्याचे आमिष दाखवले होते. त्यानुसार त्यांनी रक्कम गुंतवली असता त्यांना एक कोटी ७५ लाखांचा नफा झाला असल्याचे सांगितले होते, मात्र ही रक्कम मिळवण्यासाठी त्यांच्याकडे पैसे मागितल्याने फसवणूक झाल्याचे समजले.






**रसायनी : मोहोपाडा येथील साई बाबा मंदिरात २६व्या वर्धापन दिनानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते साईबाबांच्या मूर्तीवर दुग्धाभिषेक घालण्यात आला. मंडळाचे अध्यक्ष एम.एस. मगर, ज्ञानेश्वर सुर्वे, जयवंत अंबवणे आदी मंडळाचे सदस्यांनी अरुणशेठ भगत यांचे स्वागत केले.**

# 'सीकेटी'मध्ये शेतीतील सूक्ष्मजीवांच्या योगदानाचे मार्गदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज (स्वायत्त) येथे शेतीमध्ये वनस्पतींसाठी सूक्ष्मजीवाचे योगदान या विषयावर अतिथी व्याख्यान मंगळवारी (दि. १३) या दरम्यान घेण्यात आले.

या व्याख्यानासाठी प्रमुख पाहुणे उझबेकिस्तान येथील राष्ट्रीय संशोधन विद्यापीठाच्या प्रा. Dr. Dilfuza Egamberdieva, राजेशाही विद्यापीठ, ढाका, बांगलादेश येथील प्रा. डॉ. तंझीना येस्मिन व मायक्रोबायोलॉजिस्ट सोसायटी ऑफ इंडिया च्या विद्यापीठ समन्वयक प्रा. डॉ. मंजू फडके उपस्थित होत्या. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ.एस.के.पाटील, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बी.डी. आघाव, विज्ञान विद्याशाखा प्रमुख डॉ. जे.एस.ठाकूर, सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. निलेश वडनेरे, मायक्रोबायोलॉजिस्ट सोसायटी ऑफ इंडियाच्या कोकण विभागाचे प्रादेशिक समन्वयक आणि सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे प्रा. गणेश साठे आदी उपस्थित होते.

प्राचार्य. डॉ.एस.के.पाटील सरांनी पाहुण्यांचे स्वागत केले आणि महाविद्यालयातील विविध नाविण्यपूर्ण उपक्रमांचा आढावा घेतला. सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा.निलेश वडनेरे यांनी कार्यक्रमांची रुपरेषा सांगीतली. प्रा. डॉ. मंजू फडके यांनी मायक्रोबायोलॉजिस्ट सोसायटी ऑफ इंडियाची माहिती दिली. तसेच प्रा. डॉ. तंझीना येस्मिन यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालींसाठी शुभेच्छा दिल्या व सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे प्रा. गणेश साठे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला.

प्रा. Dr. Dilfuza Egamberdieva या ताश्कंद येथील विद्यापीठामध्ये जागतिक तापमान वाढीमुळे वनस्पतींवर होणाऱ्या परिणामांचे संशोधन करत आहेत. या कामाची दखल म्हणून UNESCO ने त्यांना २०२३चा बेस्ट मायक्रोबायोलॉजिस्ट अवार्ड देऊन सन्मानित केले आहे. त्यांनी आपल्या व्याख्यानात विद्यार्थ्यांना जागतिक तापमान वाढीमुळे वनस्पतींवर होणारे परिणाम आणि शेतीमध्ये वनस्पतीसाठी सूक्ष्म जीवाचे चे महत्व याविषयी माहिती दिली. सूक्ष्मजीवशास्त्र विभागातील तृतीय वर्षीय विद्यार्थिनी निशा जांगीड हिने सूत्रसंचालन आणि प्रा. अन्वेष वेमुला यांनी या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले.

व्याख्यानासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्राचार्य डॉ.एस.के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. निलेश वडनेरे, प्रा. गणेश साठे, प्रा.नीलिमा तीदार, प्रा.अर्चना गांधारकर, प्रा.अन्वेश वेमुला , प्रा. नमिता गरुडे, प्रा. श्वेता हुंबरवाडी आणि शिक्षकेत्तर कर्मचारीवर्ग यांनी परिश्रम घेतले. या कार्यशाळेचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर आणि सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

## संपादकीय

# लढाईपूर्वीच विजय

अन्य पक्षांतून आलेल्या नेत्यांना भाजपने मोठमोठाली पदे दिल्यानंतर निष्ठावंतांनी सतरंज्या उचलायच्या का, असे सवाल काही विरोधी नेते खोचकपणाने करतात. पण या टोमणेबाजीचा भाजपवर काहीही परिणाम होत नाही कारण भाजपमध्ये निष्ठावंतांना न्याय दिला जातोच.

**अपेक्षेप्रमाणे भारतीय जनता पक्षाने राज्यसभेच्या निवडणुकीतही बाजी मारल्यात जमा आहे. दोन वर्षांपूर्वी सत्ताधारी महाविकास आघाडीच्या तिन्ही पक्षांना देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषद निवडणुकीत धोबीपछाड दिल्याने काँग्रेसच्या चंद्रकांत हंडोरे यांना पराभव स्वीकारावा लागला होता. फडणवीस यांच्या राजकीय व्यूहरचनेची तेव्हापासूनच विरोधकांनी हाय खाल्ली असे दिसते. मात्र, या वेळेस राज्यसभेसाठी एकूण सहा उमेदवार रिंगणात उतरले असून त्या सहाही जणांचा विजय बिनविरोध होईल असे दिसते आहे. भाजपने बुधवारी दुपारी महाराष्ट्रातून तीन जणांची नावे जाहीर केली. मंगळवारीच काँग्रेसचा हात सोडून कमळ उराशी धरणारे ज्येष्ठ नेते अशोक चव्हाण यांना आल्या-आल्याच बक्षीस मिळाले. त्यांना भाजपतर्फे राज्यसभेची उमेदवारी देण्यात आली आहे. त्यांच्यासोबत भाजपच्या ज्येष्ठ नेत्या मेधाताई कुलकर्णी आणि नांदेडचे तडफदार कार्यकर्ते डॉ. अजित गोपछडे यांची नावे जाहीर करण्यात आली. मेधाताईंचे पुणे मतदारसंघातील काम वाखाणण्याजोगे आहे. भाजपच्या निरलस कार्यकर्त्यांच्या फळीमधील त्या आघाडीच्या नेत्या आहेत. अनेक अपेक्षाभंग पचवून देखील जो पक्षाशी एकनिष्ठ राहतो तो खरा कार्यकर्ता असतो. मेधाताईंचा लौकिक तसाच आहे. त्यांच्या रूपाने संसदेत पुणेकर आणि महिलावर्गाचा आवाज दुमदुमेल. नांदेडचे डॉ. गोपछडे हे तरुण वयापासून भाजपशी संबंधित आहेत. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद व मार्ड या संघटनांसोबत त्यांनी अनेक वर्षे काम केले. मेधाताई कुलकर्णी आणि डॉ. गोपछडे यांच्या रूपाने भाजपमधील निष्ठावंत कार्यकर्त्यांना आवर्जून स्थान देण्यात आले आहे. यामुळे भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे उधाण आले हे खरेच. भाजप प्रचंड वेगाने वाढणारा पक्ष आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व आणि त्यांची धोरणे यांची भुरळ इतर पक्षातील नेत्यांनाही पडते. देशाच्या विकासासाठी अहोरात्र झटणाऱ्या पंतप्रधान मोदी यांचे हात बळकट करावे आणि विकासाच्या देशव्यापी यज्ञात आपलाही हातभार असावा या हेतूने इतर पक्षांमधून भाजपकडे ओघ सुरू झाला. त्यामुळेच पक्ष नेहमीच वर्धमान राहिला आहे. अन्य पक्षांमधून इनकमिंग सुरू झाल्यामुळे भाजपवर टीका केली जाते हे खरे. पण निष्ठावंतांना या पक्षात कधीही डावलले जात नाही. वर्तमान परिस्थितीतील काही अटळ कारणांमुळे थोडाफार विलंब होऊ शकतो. पण निष्ठावंतांना न्याय दिला जातोच. मेधाताई आणि डॉ. गोपछडे हे याच समंजस धोरणाचे प्रतीक आहेत. भाजपच्या तीन उमेदवारांबरोबर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने राज्यसभेसाठी मिलिंद देवरा यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले. मिलिंद देवरा यांच्यासारखा मुंबईतील निष्ठावान कार्यकर्ता काँग्रेसने नुकताच गमावला. त्या पक्षात देवरा यांच्यासारख्या सुशिक्षित युवा नेत्याचे चीज झाले नाही. महायुतीतील तिसरा साथीदार असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने प्रफुल्ल पटेल यांची उमेदवारी जाहीर केली. तर, काँग्रेस पक्षाने चंद्रकांत हंडोरे यांना उमेदवारी दिली आहे. सत्ताधारी पक्षांचे पाच आणि विरोधकांचा एक अशा सहाही उमेदवारांचा विजय होण्याची शक्यता आहे. विनाकारण चौथा उमेदवार रिंगणात उतरवून चुरस वाढवण्यात आम्हाला रस नाही असे भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले. याला समजंस राजकारण म्हणतात.**

# पितळी पत्र्यावरील शिवचरित्रकार संजय राऊळ

खबरबात
शैलेश पालकर

शिवशाहिर बाबासाहेब पुरंदरे यांच्या 'राजा शिवछत्रपती' या शिवचरित्रातील सर्व चित्रे रेखाटणाऱ्या दिनानाथ दलालांचे निस्सिम चाहते आणि एकलव्याप्रमाणे त्यांना गुरूस्थानी मानून आपले शिवप्रेम अजरामर करण्यासाठी सरसावलेले संजय राऊळ. त्यांच्या पितळी पत्र्यावरील मेटल इचिंग प्रोसेसद्वारे आकर्षक ठरलेल्या शिवचरित्रावर आधारित कलाकृती प्रतापगडाच्या पायथ्याजवळ अप्पासाहेब उतेकर यांच्या हस्तकला केंद्रामध्ये हजारो पर्यटकांना प्रेक्षणीय ठरले आहे. आजमितीस या कलेतून साकारलेल्या हजारो कलाकृती शिवप्रेमींनी आपआपल्या आवडीनुसार खरेदी करून या कलेला वृद्धींगत केले आहे.



ज्याप्रमाणे शिवशाहिर बाबासाहेब पुरंदरे यांनी अनेक वर्षे शिवचरित्र त्यांच्या शब्दांतून श्रोत्यांच्या नजरेसमोर उभें करण्याचे सामर्थ्य दाखविले. त्या बाबासाहेबांच्याच 'राजा शिवछत्रपती' या शिवचरित्रातील सर्व चित्रे रेखाटणाऱ्या दिनानाथ दलाल यांच्या चित्रकृतींचा प्रभाव असलेले चित्रकार शिवप्रेमी संजय राऊळ यांनी पितळी पत्र्यावर तयार केलेल्या कलाकृती तेवढ्याच ताकदीने शिवचरित्रातील अनेक प्रसंग साकारून अजरामर चित्रकृतींद्वारे इतिहास जागा केला आहे. मेटल इचिंग प्रोसेसद्वारे एका चित्रासाठी पितळी पत्र्यावर तब्बल ४२ वेळा प्रक्रिया करावी लागत असल्याचे सांगणारे संजय राऊळ यांनी प्रत्यक्षात कोणतेही कमर्शियल आर्टचे प्रशिक्षण घेतले नसल्याचे सांगितले. कोणत्याही मशीनरीचा वापर होत नसलेली ही मेटल इचिंग प्रोसेसची हस्तकला भारतीय कलाविष्कारात जरी विख्यात नसली तरी संजय राऊळ यांनी या कलेवरील प्रभुत्व कलाकृतींद्वारे सिद्ध केले आहे. सुरुवातीला एका फुटाच्या पितळी पत्र्यावर कलाकृती साकारणारे राऊळ आता केवळ पाव इंची तुकड्यापासून ४×२ फूटांच्या पितळी पत्र्यापर्यंत आपल्या कलेतून केवळ आणि केवळ शिवप्रेमाची साद घालणारी चित्रे साकारत आहेत. शिवचरित्राखेरिज शिवमुद्रा असलेली लॉकेटस्, बॅचेस, किचेन्सदेखील पितळी पत्र्यावर साकारून ती शिवप्रेमींना विकून शिवप्रेमाची ज्योत तेवत ठेवण्याचे कार्य ते करीत आहेत.

मूळचे वेंर्गुल्याचे असलेले संजय राऊळ तेथून ९० सालादरम्यान मुंबईत आले आणि या व्यवसायाद्वारे मानचिन्ह, मानपत्र, गौरवचिन्ह, लोगो, नेमप्लेटस् अशी व्यावसायिक कामे करून पितळी पत्र्यावरील मेटल इचिंग प्रोसेसद्वारे रोजीरोटी चालवित होते. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास केवळ चौथीच्या पुस्तकापर्यंत मर्यादित राहू नये, असे मनोमन वाटत असल्याने या व्यवसायात काहीसा जम बसत असतानाच शिवप्रेमाची ओढ आणि 'राजा शिवछत्रपती' या शिवचरित्रातील दिनानाथ दलालांची सर्व चित्रे यामुळे त्यांनी व्यवसायाचा मार्ग बदलला.

शिवराज्याभिषेक सोहळयाचे चार प्रसंग मेटल इचिंग प्रोसेसद्वारे निर्जीव पितळी पत्र्यावर जीवंत रेखाटून शिवशाहिर बाबासाहेब पुरंदरे यांच्याकडे अन्य चित्रांच्या रेखाटनासाठी रितसर परवानगी मिळविण्यासाठी संजय राऊळ तब्बल दोन वर्षे प्रयत्न करीत होते. त्यांचे हे आगळे-वेगळे शिवप्रेम व कला पाहून तसेच योग्य मार्गानेच कलेचा वापर करण्याची वृत्ती पाहून अनेक आशीर्वादांसह परवानगीही दिली अन् राऊळांचा हुरूप वाढला. दिनानाथ दलालांच्या १०१ शिवचरित्रावरील आधारित प्रसंगांपैकी ५५ चित्रे मेटल इचिंग प्रोसेसद्वारे निर्जीव पितळी पत्र्यावर जिवंत करून राऊळांनी १३ एप्रिल २००८ रोजी शिवशाहिर बाबासाहेब पुरंदरे यांच्याहस्तेच या कलेचे लोकार्पण केले.

शहाजीराजांच्या विवाह प्रसंगापासून सुरू झालेल्या संजय राऊळांच्या पितळी चित्रप्रवासाअखेरीस शिवछत्रपतींच्या महानिर्वाणाचा प्रसंग आहे, पण प्रत्येक चित्रात पितळयावर रेखाटन असूनही शौर्य, क्रौर्य, भिती, आनंद, विजयीमुद्रेतील जल्लोष, संतोष, चिंता तसेच अनेक मानवी भाव तर प्रकटलेले दिसतातच याखेरिज वाऱ्याची दिशा स्पष्ट करणारी झाडांची पानगळ, गवतांची आणि अंगावरील कपडयांची सळसळ एवढा बारकाईने तपशील या चित्रांतून समोर आणणाऱ्या राऊळांची ही कलाच वापरून शिवप्रेम व्यक्त करण्याचा हेतू साध्य झाल्याचे त्यांच्याच तोंडून या चित्रप्रदर्शनाची लाईव्ह कॉमेंट्री ऐकताना जाणवते.

हे चित्रप्रदर्शन घेऊन शाळा-कॉलेजांमध्ये जाऊन नवतरूणांना शिवचरित्र मुखोद्गत सांगण्याची अनोखी इच्छा बाळगून असलेले संजय राऊळ गेल्या तीन वर्षांपासून जराही आत्मविश्वास न गमाविता या मेहनतीने साकारलेल्या कलाकृती योग्य किंमतीतही सहसा खरेदी करण्यास कोणीही धजावत नसल्याने लाखो रूपयांची गुंतवणूक केवळ प्रदर्शनाद्वारे लोकांपर्यंत पोहोचवित आहेत.

प्रतापगडाच्या पायथ्याजवळ अप्पासाहेब उतेकर यांच्या हस्तकला केंद्रामध्ये हजारो पर्यटकांना अत्यल्प दरात हे शिवचरित्र पाहण्यासाठी खुले असून संजय राऊळ यांच्याहाताशी आता मेटल इचिंग प्रोसेस आणि गाईड म्हणून काम करणारे १० ते १२ स्थानिक तरूणही रोजगार मिळविण्यासोबत शिवप्रेम व्यक्त करण्यासाठी कार्यरत झाले आहेत.



## बदलते तंत्रज्ञान

### आता व्हॉट्सॲपवर मेसेज वाचले तरी कळणार नाही!

व्हॉट्सॲपवर आपण केलेला मेसेज समोरच्याने पाहिला आहे की नाही हे व्हॉट्सअपच्या 'ब्ल्यू टिक्स' फीचरमुळे समजते. हे फीचर सोईचे असले तरीही कधी कधी ते अनेकांना नकोसे वाटू शकते, कारण आपण मेसेज वाचूनदेखील त्यावर रिप्लाय दिला नाही, तर समोरच्या व्यक्तीला वाईट वाटू शकते किंवा एखाद्याच्या मनात गैरसमज निर्माण होऊ शकतात.




अनेकदा असे आपल्याकडून चुकून होऊ शकते. तुम्ही एखाद्या महत्त्वाच्या कामात असताना आलेला मेसेज वाचता आणि नंतर त्यावर उत्तर देऊ म्हणून फोन बाजूला ठेवून देता, मात्र या मधल्या वेळेत समोरच्या व्यक्तीकडे तुम्ही दुर्लक्ष करीत आहात असे अगदी सहजपणे त्या व्यक्तीला वाटू शकते, परंतु या ब्ल्यू टिक्स बंद करायच्या असतील, तर तसे तुम्हाला करता येऊ शकते. ते कसे करायचे ते पाहू...

जेव्हा आपण एखाद्याला मेसेज पाठवतो तेव्हा तो सेंड झाला असल्याची माहिती देण्यासाठी ग्रे रंगाची सिंगल टिक येते. मेसेज समोरच्याला मिळाला असल्याची म्हणजेच मेसेज डिलिव्हरी झाल्याची माहिती देण्यासाठी ग्रे रंगाच्या दोन टिक्स आपल्याला दिसतात, तर समोरच्या व्यक्तीला पोहोचलेला मेसेज त्याने वाचला आहे याची माहिती आपल्या दोन ब्ल्यू टिक्सद्वारे मिळते.

**व्हॉट्सॲपवर ब्ल्यू टिक्स बंद कशा करायच्या?**

सर्वप्रथम व्हॉट्सॲप चालू करावे. त्यानंतर स्क्रीनवर उजव्या कोपऱ्यात दिसणाऱ्या तीन डॉट्सवर क्लिक करा. आता सेटिंगमध्ये जाऊन प्रायव्हसी या पर्यायावर क्लिक करा. तुम्हाला तिथे 'read receipts' असा पर्याय दिसेल. त्यावर क्लिक करून तुमच्या ब्ल्यू टिक्स म्हणजेच read receipts बंद करू शकता. तुम्हाला हवे तेव्हा या ब्ल्यू टिक्स पुन्हा सुरू करू शकता.

**इतर पर्याय पाहा**

एरोप्लेन मोड : तुम्हाला जर व्हॉट्सपचे मेसेज वाचायचे असल्यास एरोप्लेन मोड सुरू करा आणि मेसेजेस वाचा. असे केल्याने तुम्ही मेसेज वाचला आहे ते समोरच्याला समजणार नाही. मात्र, तुम्ही जेव्हा एरोप्लेन मोड बंद कराल तेव्हा चॅट्समध्ये ब्ल्यू टिक्स दिसतील.

नोटिफिकेशन : कोणतेही मेसेज आले तरी आपल्याला त्याचे नोटिफिकेशन दिसतात. त्यामुळे आलेले मेसेज तुम्ही नोटिफिकेशनमधून सहज वाचू शकता आणि तो मेसेज वाचल्याच्या टिक्स समोरच्याला दिसणार नाहीत.

# कवी, लेखक, कादंबरीकार नामदेव ढसाळ



निमित्त

नामदेव लक्ष्मण ढसाळ हे कवी, लेखक, कादंबरीकार आणि नाटककार अशा विविध पैलूंनी प्रसिद्ध असणारे दलित चळवळीमधले ज्येष्ठ नेते. मुंबईतल्या अत्यंत गरीब आणि बकाल भागात बालपण घालवल्याने त्यांनी दारिद्र्य आणि ससेहोलपट जवळून पाहिली आणि आपल्या विशिष्ट भाषेतून त्यांनी ते दलितांचे आयुष्य शब्दबद्ध केले. आजच्याच तारखेला (१५ फेब्रुवारी) १९४९ रोजी त्यांचा जन्म झाला होता.

नामदेव ढसाळ यांचा जन्म पुणे जिल्ह्यात खेड तालुक्यातील कनेरसरशेजारच्या पूर या खेड्यात झाला. त्यांच्या घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने लहानपणीच ते वडिलांसोबत मुंबईला आले. मुंबईतील गोलपीठा या वेश्यावस्ती असलेल्या भागातील झोपडपट्ट्यांमध्ये त्यांचे बालपण गेले. त्यांचे वडील खाटीक होते. नामदेव ढसाळांनी मुंबईमध्ये अनेक वर्षे टॅक्सी चालवली. ढसाळांवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर मोठा प्रभाव होता. त्यांनी काव्य, गद्य, वृत्तपत्रांतील स्तंभलेखन यातून आंबेडकरांचे क्रांतिकारी विचार मांडले. त्यांच्या क्रांतिकारी साहित्याची दखल जागतिक पातळीवरही घेतली गेली.

१९७३मध्ये नामदेव ढसाळ यांचा पहिला कवितासंग्रह गोलपिठा प्रकाशित झाला. मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले हा माओवादी विचारांवर आधारित, तर प्रियदर्शिनी हा त्यांचा इंदिरा गांधी यांच्या विषयीचा कविता संग्रह आहे, तसेच खेळ हा शृंगारिक कवितांचा संग्रह आहे.

ढसाळ यांनी साहित्याच्या माध्यमातून दलितांच्या व्यथा, वेदनांना प्रसिद्धी दिली. महाराष्ट्र आणि भारताला प्रभावित करणाऱ्या 'दलित पँथर' या आक्रमक संघटनेचे ते संस्थापक अध्यक्ष होते. या संस्थेची स्थापना त्यांनी १९७२मध्ये दलित चळवळीतील समवयस्क सहकाऱ्यांच्या व साहित्यिकांसह केली. या संघटनेवर अमेरिकेतील ब्लॅक पँथर चळवळीचा प्रभाव होता. या संघटनेद्वारा ढसाळ यांनी दलितांच्या अनेक प्रश्नांवर उग्र आंदोलने केली व तत्कालीन सरकारांना दलित हिताच्या भूमिका घेण्यास भाग पाडले. कालांतराने या चळवळीत फूट पडल्यावरही ढसाळ हे दलित पँथरमध्येच राहिले. मराठवाडा विद्यापीठ नाम विस्तारमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे. दलित चळवळीला त्याचे महत्त्वाचे योगदान आहे.

नामदेव ढसाळ हे १९६०नंतरच्या मराठी कवींमधील प्रमुख कवी समजले जातात. त्यांनी विशिष्ट शैलीने मराठी कवितेत मोलाची भर घातली. त्यांनी भाषिकदृष्ट्या प्रमाण मराठी भाषेपेक्षा वेगळी भाषा वापरली. त्यांच्या लिखाणावर लघुनियतकालिकांचा, मनोहर ओक यांचा तर काही प्रमाणात दिलीप चित्र्यांचा प्रभाव दिसतो. त्यांच्या कृतींमध्ये वेदना, विद्रोह व नकार हा स्थायीभाव आहे.

नामदेव ढसाळ आयुष्याची शेवटची अनेक वर्षे मायस्थेनिया ग्रॅव्हीज या दुर्धर आजाराने ग्रस्त होते. याशिवाय त्यांना कॅन्सरचा आजारही जडला होता. १३ जानेवारी २०१४ रोजी त्यांना मुंबईतील बॉम्बे हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. १५ जानेवारीला पहाटे चारच्या सुमारास त्यांचे निधन झाले. ते ६४ वर्षांचे होते.

नामदेव ढसाळांच्या निधनानंतर त्यांच्या स्मृती तेवत ठेवण्याच्या इराद्याने वैभव छाया आणि इतर समविचारी मित्रांनी नामदेव ढसाळ स्मृती गौरव समितीची स्थापना करून एकूण आयुष्याला सलाम करणारा सारे काही समष्टीसाठी अभिवादनपर कार्यक्रम दरवर्षी १५ जानेवारी रोजी मुंबई येथे साजरा केला जातो. या कार्यक्रमात आंबेडकरी कविता, नामदेव ढसाळ यांच्या कवितांचे वाचन, त्यांच्या कवितांचे नाट्यरूप, त्यांनी लिहिलेल्या गाण्यांचे सादरीकरण तसेच जीवनावर व कवितांवर आधारित चित्रप्रदर्शन, चित्रकविता प्रदर्शन, शाहिरी, कविता वाचन, चर्चासत्र, चित्रपट-लघुपट स्क्रीनिंग अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. (साभार : इंटरनेट)

## क्लिक...क्लिक...!







**मोहोपाडा : माघी गणपती उत्सवानिमित्त महड येथील श्री वरदविनायक मंदिरात भव्य दिव्य अशी धान्याची रांगोळी वरद विनायक फुल रांगोळी मंडळ यांनी साकारली. यासाठी ८० किलो धान्याचा वापर करण्यात आला. (छाया : राकेश खराडे)**

## आरोग्य प्रहर

### फिटनेस राखण्यासाठी चक्रासन फायदेशीर

योगसाधना आज कोट्यवधी लोकांचा फिटनेस फंडा ठरला आहे. योग जगभरात लोकप्रिय झाला आहे. बॉलीवूडचे सेलिब्रिटी तसेच हॉलीवूडचेही स्टार्सही आता योगाला महत्त्व देऊ लागले आहेत. बॉलिवूडच्या अभिनेत्री कठीण योगासनेही करीत आहेत. या अभिनेत्रींनी त्यांच्या फिटनेसचे गुपित सोशल मीडियावर शेअर केल्यामुळे सध्या त्यातील चक्रासन या योगासन प्रकाराची जास्त चर्चा होते. चला तर चक्रासन हे योगासन सविस्तर जाणून घेऊ.



योगतज्ज्ञ कामिनी बोबडे यांनी चक्रासनाचे फायदे, काय आणि काय करू नये याबद्दल मार्गदर्शन केले आहे. चक्रासन हे एक उत्कृष्ट योगासन आहे, ज्याला इंग्रजीमध्ये व्हील योग पोझ असेही म्हणतात. त्याला योगामध्ये उर्ध्वा धनुरासन, असेही नाव देण्यात आले आहे. चला तर त्याचे आपल्याला काय फायदे आहेत हे पाहू.

**चक्रासनाचे फायदे**

ऊर्जा आणि शरीरातील उष्णता वाढते. हात, पाय, पाठीचा कणा, पोटाचे स्नायू मजबूत होतात. पेक्टोरल स्नायू उघडतात. खांदे तसेच हिप फ्लेक्सर व कोर स्नायू ताणले जातात.

ग्लुट्स आणि मांड्या मजबूत होतात. बेली फॅट म्हणजेच पोटावरची चरबी कमी करण्यासाठीही चक्रासन करणे फायदेशीर ठरते. मासिक पाळीदरम्यान; ज्यांना पोटदुखी, रक्तस्राव यांचा खूप त्रास होतो, त्यांच्यासाठीही हे आसन फायदेशीर आहे.

**चक्रासन कसे करावे?**

चक्रासन हे सर्वांत कठीण योगासनांपैकी एक आहे; जे बहुतेक लोक करण्यात अपयशी ठरतात. त्यासाठी तुम्हाला आधी तयारी करावी लागेल. चक्रासन करण्यासाठी सर्वांत आधी जमिनीवर सतरंजी, योगा मॅट टाका आणि पाठीवर झोपा. त्यानंतर डोक्याच्या बाजूला दोन्ही हातांचे तळवे टेकवा. पाय गुडघ्यात दुमडा आणि तळपाय नितंबाच्या जवळ घ्या. आता तळहात आणि तळपायावर भर देऊन पाठ, कंबर, मान, डोके उचला. सुरुवातीला एकदम हे आसन जमणार नाही. त्यामुळे जेवढे जमेल तेवढेच करा. आसनातील स्थिती ३० ते ४० सेकंद टिकविण्याचा प्रयत्न करा.

चक्रासन करण्याचा प्रयत्न करण्यापूर्वी तुम्ही तुमचे हात, पाठीचा कणा, स्नायू व पाय मजबूत करण्यासाठी काही आसने केली पाहिजेत. सेतुस्ना, कंधारस्ना, भुजंगासन यांसारख्या आसनांचा तुम्ही सराव केला पाहिजे.

# पोलादपूरमध्ये ठाकरे गटाला 'झटका'

## काँग्रेस उमेदवाराचा शिवसेनेमध्ये प्रवेश



**पोलादपूर : प्रतिनिधी**

शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे यांच्या जनसंवाद यात्रेत पोलादपूर शहरातील भैरवनाथनगर सहाण परिसरात झालेल्या संवादानंतर त्याच परिसरातील असंख्य महिला-पुरूष कार्यकर्त्यांचा तसेच पोलादपूर नगरपंचायतीच्या निवडणुकीमध्ये पराभूत झालेल्या काँग्रेस उमेदवाराचा शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश घेत शिवसेना नेते आमदार भरत गोगावले यांनी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाला 'जोरका झटका' दिला आहे.

या वेळी प्रवेशकर्त्यांचे स्वागत करताना आ.गोगावले यांनी हा पक्षप्रवेश म्हणजे ज्याठिकाणी उध्दव ठाकरे यांची सभा झाली त्याठिकाणी असलेल्या महिला पुरूष कार्यकर्त्यांचा शिवसेनाप्रवेश हा बिनबुडाच्या आरोपांना प्रत्युत्तर असल्याचे मत आमदार गोगावले यांनी केले.

महाड पोलादपूर माणगाव विधानसभा मतदार संघाचे आमदार भरत गोगावले यांनी आपल्या मतदारसंघात विरोधकांना पळता भुई थोडी करण्यासाठी दररोज कोणत्या ना कोणत्या गावाचा पक्षप्रवेश शिवसेना पक्षात करण्याचे धोरण अवलंबिले आहे. ११ फेब्रुवारीरोजी प्रथम महाड तालुक्यातील विन्हेरे जिल्हा परिषद गणातील सव गावातील बौध्द वाडीतील नागरिकांनी शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला. हा धक्का विरोधकांना बसतो ना बसतो तोच पोलादपूर शहरातील महिला वर्गाने आणि पुरुषांनी ठाकरे गटाला जोरदार धक्का दिला आहे.

काही दिवसांपूर्वी पोलादपूर शहरात शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांनी पोलादपूरमध्ये जनसंवाद मेळावा घडवला. मात्र, ज्याठिकाणी पोलादपूरमध्ये संवाद मेळाव्याच्या आयोजन केले तेथील महिला वर्गाने मोठ्या प्रमाणात आमदार भरत गोगावले यांच्या उपस्थितीत शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला. तर पोलादपूर नगरपंचायतीचे काँग्रेस पक्षाकडून नगरसेवक पदासाठी निवडणूक लढविलेले उमेदवार कल्पेश मोहिते सध्या ठाकरे गटातील कार्यकर्ते असताना त्यांच्यासह अनेक तरुणांनी ठाकरे गटाला शेवटचा जय महाराष्ट्र करत शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला. त्यामुळे या संवाद मेळाव्याचा महाड व पोलादपूरवासियांवर काही परिणाम झाल्याचे दिसत नाही. उलटपक्षी, संवाद मेळावा ज्या ठिकाणी झाला त्याच ठिकाणाहून ठाकरे गटाला दणके बसायला सुरुवात झाली असून हा पक्षप्रवेश म्हणजे आमच्यावर केलेल्या बिनगुडाच्या टीकेला उत्तर आहे, असे आमदार गोगावले यांनी या वेळी सांगितले.

पोलादपूर शहरातील पक्षप्रवेशकर्त्यांमध्ये माधुरी विचारे, सारिका विचारे, पार्वती शिंदे, सानिका विचारे, अनिता शिंदे, नीता गायकवाड, ज्योती शिंदे, संजीवनी जाधव, रेखा जाधव, वंदना चव्हाण, भारती गोळे, नंदा शेलार, वनिता सकपाळ, रवीना जाधव, मंदा पारधी, राखी विनेकर, सुनिता मलगजे, श्रेया कळमकर, जनाबाई जाधव या महिलांनी तर काँग्रेसतर्फे नगरपंचायतीची निवडणूक लढणारे व सद्यस्थितीत उध्दव ठाकरे गटाचे कार्यकर्ते कल्पेश मोहिते, किनेश्वर शिववाडीचे वेणू पवार आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी आ. भरत गोगावले यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवत शिवसेना पक्षात प्रवेश केला आहे.

> **शिवसेना पक्ष राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विकास कामांच्या धडाक्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात जोरदार मुसंडी मारत असून महाड विधानसभा मतदारसंघात करत असलेल्या विकास कामांमुळे आमच्या मतदारसंघात दररोज नववीन पक्षप्रवेश होत आहे.**
> **-भरत गोगावले, आमदार**

या वेळी आमदार गोगावले, शिवसेना रायगड जिल्हा सहसंपर्कप्रमुख चंद्रकांत कळंबे, पोलादपूर तालुकाप्रमुख निलेश अहिरे, पोलादपूर शहरप्रमुख सुरेश पवार, उपनगराध्यक्ष नागेश पवार, विभाग प्रमुख लक्ष्मण मोरे, उपविभाग प्रमुख केशव खेडेकर, नगरसेवक विनायक दिक्षित, शांताराम गोळे, आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# रस्ता रुंदीकरणात विद्युत पोलची अडचण

## वाहतूक कोंडीमुळे प्रवाश्यांना त्रास

**चौक : प्रतिनिधी**

रस्ता रुंदीकरण करताना संबंधीत विभागाने काही बाबी लक्षात घेऊन त्यावर उपाययोजना केल्यास वाहनचालक, प्रवासी यांना होणारा त्रास कमी होईल, असे नागरिकांचे म्हणणे आहे. रस्ता रुंदीकरणात एका विद्युत पोलची अडचण होत असल्याने प्रवाश्यांना वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत आहे.


चौक ते कर्जत या मार्गाचे दुपदरीकरण किंवा रस्ता रुंदीकरण सुरू आहे. यातील काही भाग सार्वजनिक बांधकाम विभाग व काही भाग महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ करीत आहे. हे रुंदीकरण होणे गरजेचे होते, त्यामुळे या मार्गावरून



जाणे येणे जलद गतीने होईल, वाहतुक कोंडीला विराम मिळेल, अशी सामान्य प्रवाशी आणि वाहनचालक यांची इच्छा आहे. रस्ता रुंदीकरणाचे नियोजन करताना पूर्वी रस्त्याच्या कडेला असलेले व आता अडचणीचे ठरत असलेले विद्दुत खांब किंवा होर्डींग काढून बाजूला घेणे गरजेचे होते. रस्त्याच्या वळणावर किंवा कडेला असलेले विद्दुत खांब यामुळे काही ठिकाणी अपघात होतील असे चित्र आहे, सुदैवाने अशा प्रकारच्या घटना घडल्या नाहीत, पण प्रवाशी व चालकांच्या मनात भीती निर्माण झाली आहे.

रस्ता रुंदीकरण होतानाच अडचणीचे विद्युत खांब व हॉर्डींग दूर केल्यास योग्य होईल असे मत रोज प्रवास करणारे यांनी व्यक्त केले.

# पेणच्या रामवाडीमधील आनंदनगर येथे माघी गणेशोत्सव



**पेण : प्रतिनिधी**

पेणमधील रामवाडीमधील आनंदनगर येथे माघी गणेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.

या वेळी मंदिराचे विश्वस्त डॉ. तुषार मोहन हांडे, श्रीमती निर्मला मोहन हांडे, राजन हांडे व हांडे परिवार यांच्यासह साजेश माने, सौ दिपाली माने तसेच गणेशभक्त उपस्थित होते.

रामवाडी येथील टेकडीवर हे मंदिर असून या मंदिरात श्री गणेश व आदिमायाच्या मूर्तीची एकत्रित प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. ज्या आठ खांबांवर हे मंदिर उभारले आहे. खांबांवर अष्टविनायकाच्या आठ मूर्ती बसविण्यात आले आहे. या मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे मंदिराला दरवाजा नाही जागृत देवस्थान म्हणुन या गणपती मंदिराबाबत भाविकांची श्रद्धा असुन माघी गणेशोत्वनिमित्त हजारो भाविकांनी गणेश दर्शनाचा तसेच महाप्रसादाचा लाभ घेतला.

दरम्यान, पेण शहर व तालुका परिसरातील विविध ठिकाणच्या गणेश मंदिरात माघी गणेशोत्सव उत्साहात व भक्तीभावाने साजरा करण्यात आला. या निमित्ताने पुजा, अभिषेक, आरती, भजन, किर्तन, महाप्रसाद असे विविध धार्मिक कार्यक्रम सर्वत्र झाले. दर्शनासाठी भाविकांची सकाळपासूनच गणेश मंदीरात रिघ लागली होती.

शहरातील चावडीनाका येथील चिमण्या गणपती मंदीर, बाजारपेठेतील बांदिवडेकर यांचे गणेश मंदिर, गणपतीवाडी येथील गणेश मंदीर, रामवाडी येथील आनंद गणेश मातृ मंदिर, नवीन वसाहत येथील गणेश मंदीर, प्रभुआळी येथील गणेश मंदीर आदी विविध गणेश मंदिरात माघी गणेशोत्सव साजरा करण्यात आला.

# राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण ३ मार्चला

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे व मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.भरत बास्टेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण रायगड जिल्ह्यात रविवार ३ मार्च २०२४ रोजी राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचे आयोजन करण्यात आले असून या माहिमेत ० ते ५ वर्ष वयोगटातील सर्व बालकांना पोलिओ लसीचा जादा डोस देण्यात येणार आहे.

० ते ०५ वर्ष वयोगटातील सर्व बालकांना पोलिओ लसीचा जादा डोस पाजून लसीकरण मोहिम कार्यक्रमात सहभागी होवून सहकार्य करावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांनी केले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या राजस्व सभागृहात, राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेसंदर्भात नियोजन करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीला जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ. मनिषा विखे यांच्यासह सर्व तालुक्यातील आरोग्य अधिकारी उपस्थित होते.

या कार्यक्रमाकरीता पाच हजार ६७ आरोग्य कर्मचाऱ्यांची बुधवर नेमणूक करण्यात आली असून अंगणवाडी सेविका, आशा, शिक्षक तसेच खाजगी संस्थांचादेखील यामध्ये सहभाग करुन घेण्यात आला आहे.

---

।। अविश्रमो लोकतंत्राधिकारा ।।

**खोपोली नगरपरिषद**

खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड, पीनकोड नं ४१० २०३. फोन नं. (०२१९२) २६२२२२, २६३३५६, २६४२११

जा.क्र. केएमसी/बांधकाम/३५०२ | दिनांक :- १४/०२/२०२४

**बांधकाम विभाग**
**निविदा सुचना क्र. ६०**

खोपोली नगरपरिषद, खोपोली जि. रायगड यांजकडून खालील कामांसाठी राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागात योग्य त्या वर्गात नोंदविलेल्या अनुभवी व इच्छुक ठेकेदारांकडून ब-१ नमुन्यातील द्विनोंद लिफाफा पध्दतीने सिलबंद निविदा मागविणेंत येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम रु. | अनामत रक्कम रु. | काम करण्याचा कालावधी | निविदा फॉर्म विक्रीची किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | खोपोली नगरपरिषद हद्दीतील प्र.क्र.२ मध्ये साईबाबानगर येथे चेकर्ड लादी बसविणे. | ४९८४२० | ५०३३ | ६० दिवस | ५०० |

**कामाच्या अटी व शर्ती:-**

१. निविदा फॉर्मची विक्री कार्यालयीन वेळेत दि. १६/०२/२०२४ ते २३/०२/२०२४ पर्यंत सकाळी १०.३० ते सायं. ५.३० वा. पर्यंत राहील. मात्र या करिता निविदा फॉर्म फी नागरी सुविधा केंद्रात जमा केल्यानंतर बांधकाम विभागातुन फॉर्म उपलब्ध करून मिळेल.
सविस्तर कामासंबधी अतिरीक्त माहिती नगरपरिषदेचे बांधकाम विभागात कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस खेरीज) मिळू शकेल.

**सही /-**
**मुख्याधिकारी**
खोपोली नगरपरिषद

---

## जाहीर सूचना

आम्ही **मे. एकदंत इम्पेरिया एलएलपी,** सर्वसाधारण जनतेस कळवू इच्छितो की महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाने आमच्या स. नं. ४०/३/२/१, ४०/३/२/२, ४०/४ गाव-शेडुंग, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड प्रकल्पाला दिनांक ०७ फेब्रुवारी,२०२४,रोजी पत्र क्रमांक SIA/MH/INFRA2/448761/2023, ECIdentification No.EC24B038MH110055 अन्वेय पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून मान्यता दिली आहे. सदर मान्यता पत्राची प्रत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयामध्ये तसेच पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या http://parivesh.nic.in/ संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

दिनांक : १४/०२/२०२४

**सही/-**
भागिदार
मे. एकदंत इम्पेरिया एलएलपी साठी

---

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, खालील परिशिष्टात नमूद केलेली जमीन मिळकत ही श्री. जयवंत रामचंद्र पगडे यांच्या मालकीची हक्काची मिळकत आहे. आमचे अशिल मे. बेटर होम डेव्हलपर्स तर्फे प्रोप्रा. श्री. अब्बासअली चाँद हे खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत श्री. जयवंत रामचंद्र पगडे यांच्याकडून त्यामधील विकसन हक्कासह, हितसंबंधासह विकसनास घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणेः-

**मौजे-कोळखे पेठ, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड.**

| भुमापन नं./ हि. नं. | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकाचे नाव |
|---|---|---|---|
| ३४अ/१५/३ (जुना भुमापन नं. १२३अ, हिस्सा नं. १५ पैकी प्लॉट नं. ३) | २-८०-०० | २८.०० | श्री. जयवंत रामचंद्र पगडे |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. १०/०२/२०२४.

**सही/-**
**ॲड. संदिप बटवाल**

**कार्यालय :** सदनिका नं. १०३, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६.

---

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की आमचे अशिल सौ. उषा भगवान वाजेकर यांनी मौजे - तुरमाळे, ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत कायम स्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिनीचे वर्णन**
**मौजे - तुरमाळे, ता. पनवेल, जि. रायगड**

| मौजे | जमिन भोगवटादाराचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार |
|---|---|---|---|---|---|
| उमरोली | शंकर पोशा म्हसकर<br>धर्मा पोशा म्हसकर<br>सुरेखा बाळाराम म्हसकर<br>उषा भगवान वाजेकर<br>हेमंत बाळाराम म्हसकर<br>ज्योती जनार्दन चोरघे<br>वर्षा धिरेंद्र ठाकूर<br>निलेश बाळाराम म्हसकर<br>मंदाबाई कृष्णा चौधरी<br>अनिता रमेश भगत<br>बाळाराम महादू टकले<br>पदीबाई मुरलीधर गोरे<br>ज्ञानेश्वर महादू टकले<br>सुमन प्रकाश भगत<br>गणेश बाळाराम गायकर<br>रसिका रामदास मुकादम<br>जगन्नाथ बाळाराम गायकर<br>पुजा परेश वडे<br>बाळाराम हरिभाऊ उदरे ---- ताबा धारक | ६५ | ४ | ०-३९-००<br>पो.ख.०.०१.०० | १०.१२ |

**सदर जमिनमिळकती पैकी ०.२०.०० गुठे जमिन मिळकत जाहीर नोटीसाचा विषय**

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, साठेकरार, वचनपत्र, कुळ, वहिवाट, लिज, अन्नवस्त्र, पोटगी, इजमेंट, वारसाहक्क, हुकूमनामा वगैरे असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपली लेखी हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासहीत खालील सही करणार यांचेकडे रजि. पोस्टाने अथवा समक्ष दाखल करावी. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास वरील मिळकती या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून सदरचे मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व उशीरा येणाऱ्या हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत ह्याची नोंद घ्यावी.

ता. १४/०२/२०२४
पनवेल

**सही/-**
**ॲड. प्रधान मधूकर पाटील**
१३५, नगरपालिका कॉम्प्लेक्स,
ता.पनवेल, जि.रायगड
मोबाईल. ९३२४३७५५०२

---

**पोलीस अधीक्षक कार्यालय, रायगड-अलिबाग**

टिळक रोड, हिराकोट तलावाशेजारी, अलिबाग,
ता.अलिबाग, जि. रायगड

दुरध्वनी क्र. ०२१४१-२२२०२८/२२८४७३
फॅक्स क्र.०२१४१-२२८७८९, ई-मेल - sp.raigad@mahapolice.gov.in

## जाहिरात

पोलीस अधीक्षक रायगड-अलिबाग यांचेमार्फत महाराष्ट्र पोलीस विभाग, वाहतुक विभाग व सुरक्षा विभाग यांना आवश्यक असणारा ड्रोन खरेदी करण्यासाठी जाहिरातीचा अंदाजे खर्चाच्या ई-निविदा मागविण्या येत असून पोलीस अधीक्षक रायगड-अलिबाग कार्यालयातून त्याबाबतची सविस्तर माहिती www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

क्र. जिमाका/राअ/जाहि/२३०/२०२३-२४

---


JANARDAN BHAGAT SHIKSHAN PRASARAK SANSTHA'S

**RAMSHETH THAKUR PUBLIC SCHOOL, ULWE**

**Proposed C.B.S.E. School**
**Plot no: 01, Sector-12, Ulwe, Tal - Panvel.**

**STAFF RECRUITMENT**

**Applications are invited for the following posts for the Academic Year 2024-2025 for immediate appointment**

| POSTS | QUALIFICATIONS |
|---|---|
| **(A) Teaching Staff** | |
| PRT-SOCIAL STUDIES | B.A. / M.A. or its equivalent with at least 50% marks and Bachelor of Education (B.Ed.) with teaching experience in CBSE school at primary level. |
| Sport Teacher (01) | B.P.Ed / M.P.Ed. (from Recognized University) |
| **(B) Non-Teaching Staff** | |
| Typist | Any Graduate with 02 years' experience (Typing Speed 60 w.p.m. in English and 40 w.p.m. in Marathi) |

- Applications with full details (Email address & WhatsApp no) should reach with attested xerox copies of certificates to CHAIRMAN, JBSP SANSTHA, Plot no: 8, Sector-14, New Panvel, Tal: Panvel. Dist: Raigad. Navi Mumbai. 410206.
- Candidates may submit the application by email to **jbspsanstha1992@gmail.com** or by post on or before **26/02/2024 (Monday).**
- If required Contact - **MRS. PATANKAR SAYLEE : 9930718675**
  **BALKRISHNA PATIL : 8108585055**

**Shri. Ramsheth Thakur (Ex.M.P.)**
**Chairman,**
**Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel**


---

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की आमचे अशिल श्री. नरेश हरिभाऊ भोईर यांनी मौजे - तुरमाळे, ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत कायम स्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिनीचे वर्णन**
**मौजे - तुरमाळे, ता. पनवेल, जि. रायगड**

| मौजे | जमिन भोगवटादाराचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार |
|---|---|---|---|---|---|
| उमरोली | शंकर पोशा म्हसकर<br>धर्मा पोशा म्हसकर<br>सुरेखा बाळाराम म्हसकर<br>उषा भगवान वाजेकर<br>हेमंत बाळाराम म्हसकर<br>ज्योती जनार्दन चोरघे<br>वर्षा धिरेंद्र ठाकूर<br>निलेश बाळाराम म्हसकर<br>मंदाबाई कृष्णा चौधरी<br>अनिता रमेश भगत<br>बाळाराम महादू टकले<br>पदीबाई मुरलीधर गोरे<br>ज्ञानेश्वर महादू टकले<br>सुमन प्रकाश भगत<br>गणेश बाळाराम गायकर<br>रसिका रामदास मुकादम<br>जगन्नाथ बाळाराम गायकर<br>पुजा परेश वडे<br>बाळाराम हरिभाऊ उदरे ---- ताबा धारक | ६५ | ४ | ०-३९-००<br>पो.ख.०.०१.०० | १०.१२ |

**सदर जमिनमिळकती पैकी ०.२०.०० गुठे जमिन मिळकत जाहीर नोटीसाचा विषय**

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, साठेकरार, वचनपत्र, कुळ, वहिवाट, लिज, अन्नवस्त्र, पोटगी, इजमेंट, वारसाहक्क, हुकूमनामा वगैरे असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपली लेखी हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासहीत खालील सही करणार यांचेकडे रजि. पोस्टाने अथवा समक्ष दाखल करावी. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास वरील मिळकती या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून सदरचे मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व उशीरा येणाऱ्या हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत ह्याची नोंद घ्यावी.

ता. १४/०२/२०२४
पनवेल

**सही/-**
**ॲड. प्रधान मधूकर पाटील**
१३५, नगरपालिका कॉम्प्लेक्स,
ता.पनवेल, जि.रायगड
मोबाईल. ९३२४३७५५०२

# ‘गाव चलो’मधून लोकोपयोगी उपक्रम

## नवी मुंबईतही अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्र भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या आदेशानुसार नवी मुंबई भाजपा जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांच्या पुढाकाराने नवी मुंबईतील प्रत्येक गावात व प्रभागात गाव चलो अभियान हा जागृती, संवाद व आशीर्वादपर उपक्रम थेट जनतेत जाऊन राबविण्यात येत असून वाशी गाव सानपाडा पामबीच इथ गाव चलो अभियान नवी मुंबई जिल्हा उपाध्यक्ष दशरथ भगत यांनी राबविला.

या संवाद व जनजागृतीपर उपक्रमांतर्गत अंत्योदय संकल्पनेचे प्रणेते पं. दीनदयालजी उपाध्याय यांच्या स्मृतिदिना प्रित्यर्थ उपाध्यक्ष दशरथ भगत यांच्या उपस्थितीत वाशीगाव येथे ग्रामस्थ व प्रभाग क्र.७७ आणि ७८ सानपाडा पामबीच मधील रहिवासीयांशी तसेच परिसरातील व्यापारी, लहानमोठे



दुकानदार व फेरीवाले यांना गांव चलो अभियान उपक्रमाच्या पुस्तिकांचे वाटप करून करण्यात आले. या पुस्तिकेतील विविध लोकोपयोगी योजनांबाबतीत जनतेशी चर्चेद्वारे संवाद साधण्यात आला. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या १० वर्षांच्या पंतप्रधान कार्यकाळात देशातील ज्येष्ठ, महिला, युवा वर्ग, सर्व घटकांतील जनतेला प्रादेशिक व भौगोलिक दृष्ट्या समतोल साधून विविध जनकल्याणाच्या योजनांद्वारे प्रत्यक्ष लाभ मिळवून दिलेला आहे व देत आहेत, असे असल्याचे दशरथ भगत यांनी या वेळी बोलताना सांगितले.

गाव चलो अभियान अंतर्गत वाशी गाव, सानपाडा पामबीच येथील नागरिकांना नवी मुंबई मनपा, केंद्रीय अथवा राज्य सरकारच्या विविध लोककल्याणकारी योजना राबविण्यासाठी मी कटीबद्ध आहे. त्यासाठी जनसंपर्क कार्यालयात समर्पित सेवा सुरू असल्याचे दशरथ भगत यांनी सांगितले. या वेळी प्रत्यक्ष संवादा दरम्यान ग्रामस्थ, मच्छीमार बांधव-भगिनी, रहिवासी, खेळाडू, पोलीस बांधवांचे कुटुंबीय व व्यापारी दुकानदार आणि फेरीवाले यांचे प्रश्न समस्या भगत यांनी जाणून घेतल्या.

या वेळी नवी मुंबई जिल्हा गाव चलो अभियानचे प्रमुख सुरेश गायकवाड, वाशीगावच्या माजी नगरसेविका फशीबाई भगत, माजी नगरसेविका वैजयंती भगत, युवा नेता निशांत भगत, संदीप भगत, जेष्ठ ग्रामस्थ सूर्यकांत भोईर, शक्ती केंद्र प्रमुख हरिश्चंद्र सुतार, बूथ अध्यक्ष सुधाकर भोईर, सुरेश म्हात्रे, किरण सुतार, निरज पाटील, रोहित खंडागळे, तुषार पाटील, मंगेश म्हात्रे, युनूस फरास, निखिल खाडे, आशिष घरत हे उपस्थित होते.

## नेरूळ गावात एकाची हत्या; मयत मोक्का आरोपी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील नेरूळ गावात राहणाऱ्या चिराग लोके या ३० वर्षीय व्यक्तीची हत्या करण्यात आली आहे. यातील आरोपीची माहिती पोलिसांना मिळाली असून मयत आणि त्याचे मारेकरी दोन्ही अभिलेखवरील आरोपी असल्याची माहिती समोर आली आहे. नेरूळ गावात राहणाऱ्या चिराग लोके याची राहत्या घराच्या सोसायटी पार्किंगमध्ये हत्या करण्यात आली. त्याच्या डोक्यात लोखंडी सळईने वार केल्याने तो जखमी झाला त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, पण डॉक्टरांनी त्याला मयत घोषित केले.

ज्यावेळी ही घटना घडली त्यावेळी त्याची बायको त्याच्या समवेत होती. तिने पतीला वाचवण्याचा प्रयत्न केला, मात्र मारेकऱ्यांना तिलाही मारहाण केली त्यात तीसुद्धा जखमी झाली आहे. ही घटना मंगळवारी संध्याकाळी साडेपाच सहाच्या सुमारास घडली. मयत चिराग हा त्याच्या मुलास शाळेतून घरी आणण्यास पत्नी समवेत गेला होता. मुलाला घरी आणल्यावर सोसायटी पार्किंग मध्ये तो गाडी लावत होता. तर मुलगा घरी गेला. गाडी लावताना काही लोक तिथे आले त्यांची आणि चिराग यांची बाचाबाची झाली. आणि काही कळण्याच्या आत त्यांनी चिराग याला जबर मारहाण सुरू केली होती.

चिराग हा सुद्धा गुन्हेगारी पार्श्वभूमी चा असून त्याच्या विरोधात संघटित गुन्हेगारी सारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत. अशी माहिती नेरूळचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक तानाजी भगत यांनी दिली. आरोपी निष्पन्न झाले असून लवकरच ते गजाआड असतील विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## गव्हाण विद्यालयात राष्ट्रीय जंतनाशक दिन

### विद्यार्थ्यांना दिल्या मोफत एल्बेंडझॉल गोळ्या




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय जंतनाशक दिन मोहीम अंतर्गत जंतनाशक सप्ताहा निमित्त रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमधील विद्यार्थ्यांना जंतनाशक गोळ्यांचे वितरण करण्यात आले.

आरोग्य विभागाच्या वतीने जंतांचे प्रादुर्भाव चक्र खंडित करण्यासाठी आणि शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर जंतांचा जीव घेणा प्रादुर्भाव थोपवण्यासाठी विद्यार्थ्यांना विद्यार्थी व शिक्षकांना समुपदेशन करून विद्यार्थ्यांना आरोग्य विभागाच्या वतीने या गोळ्या देण्यात आल्या.

विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे यांच्या मार्गदर्शनाखाली उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले, विद्यालयाचे आरोग्य तपासणी विभागाचे प्रमुख एकनाथ ठाकूर आणि सर्व वर्ग शिक्षकांनी या जंतनाशक गोळ्यांच्या वितरणाची व्यवस्था केली. गव्हाण प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने आरोग्य अधिकारी आणि त्यांच्या समन्वयकांनी व आरोग्य कर्मचारी यांनी योग्य भूमिका पार पाडून ही मोहिम यशस्वी केली.

१३ फेब्रुवारी २०२४ रोजी विद्यालयातील ६३६ विद्यार्थ्यांनी अल्बेंडझोल या गोळ्या घेतल्या.उर्वरित विद्यार्थ्यांना २० फेब्रुवारी अखेर एल्बेंडझॉल या जंतनाशक गोळ्या वितरित करण्यात येणार असल्याची माहिती विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे यांनी दिली.

## फुंडे येथे बक्षीस वितरण

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे उरण तालुक्यातील फुंडे येथील तुकाराम हरि वाजेकर व वीर वाजेकर आर्ट्स, सायन्स अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने वीर वाजेकर पुण्यतिथी व वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात आला आहे.

गुरुवारी (दि. १५) सकाळी १०.३० वाजता होणाऱ्या या समारंभाचे प्रमुख पाहुणे ‘रयत’चे मॅनेजिंग कौंसिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व प्रमुख वक्ते ज्येष्ठ पत्रकार, साहित्यिक व विचारवंत उत्तम कांबळे आहेत.

बाळाराम पाटील यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कार्यक्रमात सन्माननीय उपस्थिती म्हणून फुंडे हायस्कूलचे चेअरमन कृष्णाजी कडू, संस्थेचे उपाध्यक्ष पी.जे. पाटील, महाविद्यालय विकास समिती सदस्य भावना घाणेकर, ‘रयत’चे जनरल बॉडी सदस्य सुधीर घरत उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तु. ह. वाजेकर विद्यालय, वीर वाजेकर कॉलेज शिक्षक, विद्यार्थी, कर्मचारी मेहनत घेत आहेत.

## ठाकरे गटातील अनेकांचा शिवसेनेत प्रवेश

**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तथा मावळ लोक सभा खासदर व संसदरत्न श्रीरंग अप्पा बारणे ह्यांचा वाढदिवस चला हवा देऊया हा सुप्रसिद्ध हास्य कार्यक्रमाच्या माध्यमातून कळंबोली येथील छत्रपती शिवाजी क्रीडा मैदानात मोठ्या जल्लोषात साजरा केला गेला. हा कार्यक्रम बघायला नागरिकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. या वेळी अनेकांनी शिवसेनेचा भगवा ध्वज हाती घेऊन जाहीर प्रवेश केला.

ह्याच कार्यक्रमामध्ये, एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्व आणि कार्यपद्धती तथा राजकारण, कौशल्यशी प्रभावित होऊन विविध इतर पक्षाच्या महिला पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी,



शिवसेना पक्षात जाहीर पक्ष प्रवेश केला. ह्या वेळी खासदार श्रीरंग अप्पा बारणे, पनवेल जिल्हा प्रमुख रामदास शेवाळे, पनवेल महानगर संघटक मंगेश रानावडे व पनवेल विधानसभा परिसरातील सर्व शहर प्रमुख यांनी सर्व प्रवेश करणाऱ्या महिलांचे मनःपूर्वक स्वागत केले.

यामध्ये प्रामुख्याने उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या उपमहानगरप्रमुख रिना पाटील, माजी शहरप्रमुख पारुल सुर्यवंशी यांच्यासह पार्वती पाटील, लीला पवार, कोमल पाटील या उद्धव बाळासाहेब गटाच्या महिला पदाधिकारी तसेच मयूर पाटील, मन पटेल, इथेषयाम उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या -युवासेना पदाधिकार), मनसे खारघर महिला शहराध्यक्षा चंचला बनकर, आंजनी सरांफ, भावना भिऊनगडे, पद्मा सरांफ, शितल भिऊनगडे, वैशाली पंडित, तारा आदींनी पक्ष प्रवेश केला आहे.

## खारघरच्या रामशेठ ठाकूर महाविद्यालयात स्त्री सुरक्षा व सायबर सेक्युरिटीवर सत्र



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात बुधवारी (दि. १४) सकाळी ११ वाजता राष्ट्रीय सेवा योजना अध्ययन व अध्यापन विस्तार विभाग व वुमन डेव्हलपमेंट सेल तसेच पनवेल महानगरपालिका व नवी मुंबई पोलीस आयुक्तालय यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर सेक्युरिटी व स्त्री सुरक्षावरती सत्राचे आयोजन केले होते.

या सत्रासाठी नवी मुंबई आयुक्तालयातील पोलीस अधिकारी तसेच पनवेल महापालिकेतील अधिकारी यांनी उपस्थित राहुन महाविद्यालयातील सर्व शाखेतील प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थिनींना स्वसंरक्षणासाठी पोलीस खात्याकडून सहायता कशा पद्धतीने मिळवली पाहिजे, वेगवेगळे हेल्पलाइन नंबर्स तसेच सायबर सेक्युरिटी याविषयी मोलाची मार्गदर्शन केले. महाविद्यालयातील सुमारे १०० विद्यार्थ्यांनीनी या सत्राचा लाभ घेतला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी महाविद्यालयातील विद्यार्थिनींना सत्रासाठी शुभेच्छा दिल्या व मार्गदर्शन केले.

या सत्राचे आयोजन प्राध्यापक प्रथमेश ठाकूर (समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना) व प्रा. महेश धायगुडे (समन्वयक, अध्ययन अध्यापन व विस्तार विभाग) यांनी केले तसेच प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. करिष्मा कडव, प्रा. शिल्पा पाटील, प्रा. राहुल कांबळे, प्रा. राजश्री म्हात्रे, प्रा. प्रतीक्षा पाटील, प्रा. प्रथमेश उदेकर, प्रा. विशाल देशमुख व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

## जलरंग कला महोत्सवात पनवेलचा केविन डायस करणार प्रतिनिधित्व

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उस्ताद अल्लाउद्दीन खान संगीत एवम कला अकादमी आणि मध्यप्रदेश सांस्कृतिक विभाग आणि मध्य प्रदेश सरकारच्या वतीने भारतातील सर्वांत मोठे जलरंग कला महोत्सव आयोजित केले आहे. या महोत्सवात पनवेलचा चित्रकार केविन डायस हा गट प्रतिनिधीत्व करणार आहे.

खजुराहो आर्ट मार्ट वॉटर कलर इंटरनॅशनल फेस्टिव्हल प्रदर्शनासाठी केविन डायससह १२ कलाकारांचा गट निवडला गेला आहे. हे प्रदर्शन उस्ताद अल्लाउद्दीन खान संगीत एवम कला अकादमी आणि मध्यप्रदेश सांस्कृतिक विभाग आणि मध्य प्रदेश सरकार यांनी आयोजित केले आहे. मध्यप्रदेश सरकारने आयोजित केलेले



हे भारतातील सर्वांत मोठे जलरंग कला महोत्सव आहे. खजुराहो, मध्यप्रदेश येथे हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. ट्रेन प्रवास खर्च, निवास, जेवणाचा खर्च मध्य प्रदेश सरकार उचलणार असून या समूह प्रदर्शनासाठी केविन डायस हा गट प्रतिनिधी म्हणून प्रतिनिधित्व करणार आहे.

केविन डायस आणि सुमेध कुलकर्णी हे मध्यप्रदेश येथे या गटाचे प्रतिनिधीत्व करणार आहेत. केविन डायस, ओंकार उपरे, अजय साळवे, सुमेध कुलकर्णी, साग्निक सेन, ओंकार मोहिते, वामन तुळसकर, अनुप बेलवकर, प्रणव पळसे, मकरंद राणे, मयूर पाष्टे, विशाल कोठावळे अशी निवड झालेल्या १२ कलाकारांची नावे आहेत.

## नेरूळमध्ये माघी गणेश जयंतीला अखंड हरीनाम सप्ताह

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

परमपूज्य विश्वचैतन्य श्री गगनगिरी नाथांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या पुण्यभूमी नेरूळमधील श्री गणेश हाऊसिंग सोसायटीमध्ये माजी उपमहापौर संस्थापक अध्यक्ष अशोक अंकुशराव गावडे यांच्या वतीने सलग २४ वर्षांपासून श्री माघी गणेशोत्सव जयंती निमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन मोठ्या भक्तिमय आणि धार्मिक वातावरणात करण्यात येते.

यंदाही माजी नगरसेविका सपना गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली अखंड हरीनाम सप्ताह आणि माघी गणेशोत्सव मोठ्या भक्तिमय आणि धार्मिक वातावरणात झाला. प्रारंभी, माजी नगरसेविका सपना गावडे यांच्या हस्ते श्री गणेश पूजन, टाळ पखवाद विणा पुजन करून श्री अखंड हरीनाम सप्ताहास सुरुवात करण्यात आली. या सप्ताहात अखंड हरिपाठ, हरि किर्तन भजन,



प्रवचने सुप्रसिद्ध प्रवचनकारानी आपल्या सुश्राव्य वाणीने सादर करून भक्तीचा जागर केला.

माघी गणेश जयंतीदिनी हभप राजेंद्र महाराज सदगीर (संगमनेर) यांचे काल्याचे किर्तन, चैतन्य बाबाजी भजनी मंडळ,वरळी आणि पंच परमेश्वर महिला भजनी मंडळ, नेरूळ यांनी सुश्राव्य वाणीने सांप्रदायिक भजन गाऊन भक्तीचा जागर केला. या वेळी अखंड हरीनाम सप्ताह आणि माघी गणेश जयंतीनिमित्त आयोजित पालखी सोहळ्यात हजारो भक्तांनी सहभाग घेतला.

श्री गणेश सोसायटीमधील श्री गणेश मंदिरात श्री गणेश जन्मोत्सव सोहळा पार पडला. सकाळ पासूनच रांगा लावून भाविकांनी दर्शनाचा मनोभावे लाभ घेतला.

या वेळी माजी नगरसेविका निर्मला अशोक गावडे, मनाली गावडे-भगत यांच्या वतीने भव्य हळदीकुंकू सोहळा तसेच मान्यवरांचा सत्कार उपमहापौर अशोक गावडे यांच्या उपस्थितीत करण्यात आला. भक्तगणांसाठी आयोजित करण्यात आलेल्या महाप्रसादाचा लाभ पंचक्रोशीतील भक्तानी घेतला.




## निवडक



### सुवर्णा जाधव यांना पुरस्कार जाहीर

**माणगाव** : येथील नवदुर्गा महिला बचत गट एकतानगरच्या अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्त्या सुवर्णा रुपेश जाधव यांना अविष्कार फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य रायगड जिल्हा शाखेतर्फे राज्यस्तरीय राजमाता जिजाऊ पुरस्कार २०२४ जाहीर केला असल्याची माहिती निवडपत्र पाठवून फाऊंडेशनचे संस्थापक तथा पत्रकार संजय पवार, फाऊंडेशनचे जिल्हाध्यक्ष तथा निवड समितीचे सदस्य शंकर शिंदे यांनी दिली. या पुरस्काराचे वितरण २४ एप्रिल २०२४ रोजी सकाळी १०.३० वा.पंढरपूर होणार आहे. पुरस्कार जाहीर झाल्याचे निवडपत्र नगरध्यक्ष ज्ञानदेव पवार यांच्या हस्ते देण्यात आले. या वेळी फाऊंडेशनचे जिल्हाध्यक्ष शिंदे, पत्रकार सचिन देसाई, रुपेश जाधव, काव्या जाधव, आकांशा नाकते आदी उपस्थित होते. पुरस्काराबद्दल जाधव यांचे अभिनंदन होत आहे.

### उपविभागीय पोलीस अधिकारीपदी रेळे



**कर्जत** : येथील उपविभागीय पोलीस अधिकारी विजय लगारे यांची नांदेड येथे बदली झाल्यानंतर त्या पदावर डी. डी. रेळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. रेळे यापूर्वी नवी मुंबईमधील वाशी डिव्हिजनचे अधिकारी म्हणून कार्यरत होते. ते सोलापूर जिल्ह्यातील असून अत्यंत अभ्यासू पोलीस अधिकारी आहेत.

### म्हसळ्यात वाहतूक जनजागृती

**म्हसळा** : देशभरात ११ ते १७ फेब्रुवारीदरम्यान वाहतूक सुरक्षा सप्ताह पाळला जातो. वाढत्या अपघातांना आळा घालण्यासाठी वाहतूक पोलीस शाखेकडून प्रबोधनात्मक जनजागृती करण्यावर या वेळी विशेष भर दिला जाणार असल्याचे वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक संजय पवार यांनी येथे सांगितले. म्हसळ्याच्या पोलीस उपनिरीक्षक योगिता बांडे, स्थानिक वाहतूक विभागाचे हेड कॉन्स्टेबल विनायक चांदोरकर यानी वसंतराव नाईक कॉलेजमधील विद्यार्थ्यांसाठी उपक्रम राबविला. तेव्हा पवार बोलत होते. त्यांनी वाहतूक नियमांचे पालन करा, असे आवाहन केले. या उपक्रमावेळी रिक्षा संघटनेचे पदाधिकारी एजाज घरटकर अमोल जंगम, मकबूल रज्ञफ, हुसेन दोंदीलकर, इश्तियाक दामाद, विजय जंगम, अभिषेक शितकर आदी उपस्थित होते.

# भातपिक क्षेत्र घटल्याने शेतकरी चिंतेत

## नादुरुस्त कालवा, पाणी सोडण्यास विलंबामुळे रब्बी पिकांवर संक्रात

**माणगाव : प्रतिनिधी**



डोलवहाळ बंधाऱ्यातील कालवा ठिकठिकाणी नादुरूस्त झाला आहे. शासनाकडूनही या कालव्याची साफसफाई करण्यासाठी पुरेशी यंत्रसामुग्री मिळत नसल्याने तालुक्यातील शेवटच्या शेतीपर्यंत पाणी पोहचत नाही. यामुळे रब्बी हंगामातील पिकाचे क्षेत्र कमी होऊन भातपिक धोक्यात येत आहे.

रब्बी हंगामातील भाताचे पिक हे शाश्वत पिक म्हणून शेतकरी या मुख्य पिकाकडे मोठ्या प्रमाणात वळतो, मात्र यंदाच्या वर्षी काळ प्रकल्पाच्या कालव्याला मुदतीत पाणी न सोडल्याने तसेच दोन वेळा अवकाळी पाऊस पडल्याने शेतकऱ्यांनी यंदा कमी प्रमाणात भातपिकाची पेरणी केली आहे. यंदाचे वर्षी माणगाव तालुक्यात भातपिकाची लागवड ११५ हेक्टर क्षेत्रावर केली.

दिवसेंदिवस या क्षेत्रात घट होत असून सध्या स्थितीत कालवा पाण्यामुळे एक हजार हेक्टर क्षेत्र पडून आहे. याचा फटका जिल्ह्याच्या बाजारपेठेलाही बसणार आहे. भात या मुख्य पिकाबरोबरच शेतकऱ्यांनी कडधान्याचे पिकही मोठ्या प्रमाणात घेतले आहे. यंदा वाल ७०० हेक्टर, मूग ३५० हेक्टर, हरभरा २०० हेक्टर, मटकी १०० हेक्टर एकूण १३५० हेक्टर तर कलिंगड ४०० हेक्टर, भाजीपाला १०० हेक्टरवर लागवड केली आहे. दरवर्षी १५ डिसेंबर रोजी कोकण हंगाम पिकासाठी काळ प्रकल्पांतर्गत डोलवहाळ बंधाऱ्याचे पाणी डाव्या कालव्यातून माणगावमधील शेतीला सोडण्यात येते. यंदाचे वर्षी हे पाणी ५ जानेवारीला कालव्याला दरवर्षीपेक्षा २० दिवस उशिरा सोडल्यामुळे शेतकरी नाराज होता. त्यातच दोन वेळ अवकाळी पाऊस पडल्यामुळे शेतीला फटका बसला आहे.

यंदा भाताची क्षेत्र कमी झाले असले तरी कडधान्याच्या क्षेत्रात मोठी वाढ झाली आहे. यंदा कडधान्य चवळी, वाल, मुग, त्याचबरोबर कांही शेतकऱ्यांनी तूर, उडीत, हरभरा भुईमुग, तीळ तसेच भाजीपाला लागवड करण्यात आली आहे. तसेच शेती व्यावसायाला पूरक नगदी पिक म्हणून कलिंगड मोठ्या प्रमाणात पिकवले आहे. रब्बी भाताचे क्षेत्र वाढवण्यासाठी शासनांनी विशेष प्रयत्न करण्याची गरज आहे.

# पेण बँक संघर्ष समितीची बैठक

## ठेवीदारांच्या न्यायासाठी पुन्हा एकवटले खातेदार

**कर्जत : प्रतिनिधी**

पेण अर्बन बँक संघर्ष समितीकडून कर्जत येथे पुन्हा एकदा ठेवीदारांना पैसे मिळवून देण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. बँकेच्या मालमत्तेचा लावण्यात आलेली ईडी दूर करण्यात यावी आणि ठेवीदारांना विम्याची रक्कम पाच लाखांच्या नियमानुसार देण्यात यावी यासाठी संघर्ष समितीकडून पुन्हा एकदा एल्गार पुकारण्यात आला.




बँकेची मिळकत विकून ठेवीदारांना त्यांचे पैसे मिळवून देण्याचा समितीचा मानस असतानाच बँकेच्या मिळकतीवर लावण्यात आलेली ईडी आणि हायकोर्टामध्ये लढाई सुरू आहे. यासंदर्भात ठेवीदारांना माहिती देण्यासाठी आणि चर्चा करण्यासाठी कर्जत येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. या वेळी पेण बँक संघर्ष समितीचे अध्यक्ष शिरीष विवरे, सचिव चिंतामण पाटील, सदस्य प्रदीप म्हात्रे, प्रदीप कदम, धनंजय देशमुख, मोहन सुर्वे आणि प्रदीप शहा आदी प्रमुख उपस्थित होते.

> **ठेवीदारांसाठी विम्याची मर्यादा २०१९च्या जीआरनुसार पाच लाख आहे, मात्र बँक बुडीत गेली त्यावेळी ही रक्कम एक लाख होती. पाच लाख ठेवी विमा रक्कम वाढवण्याचे प्रयत्न सुरू आहेत, तसेच प्रॉपर्टीवर असलेला ईडी बोजासंदर्भात हायकोर्टात निकाल ठेवीदारांच्या बाजूने लागला आहे मात्र सुप्रीम कोर्टात ईडीसोबत प्रकरण सुरू आहे.**
> **–पी. के. जगताप, निबंधक, प्रशासकीय मंडळ सदस्य**

# नागोठणेजवळील भिसेखिंडीत माकडांचा वावर वाढला

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे–रोहा रस्त्यादरम्यान असलेल्या भिसेखिंडीतून दररोज अनेक प्रवासी ये–जा करीत असतात. या खिंडीत रस्त्याच्या दुतर्फा घनदाट जंगल आहे. या जंगलातील माकडे रस्त्यालगत बसलेली असतात. प्रवासी कुतुहलाने या माकडांना पाहण्यासाठी थांबून माकडांना खाऊ घालतात. अनेक वेळा ही माकडे थेट रस्त्यावर येत असल्याने अपघाताचा धोका वाढला आहे.

भिसेखिंडीतून अनेक प्रवासी दैनंदिन रोहा येथे जातात, तसेच अनेक पर्यटक याच खिंडीतून कोकणात फिरण्यासाठी जातात.



त्याचबरोबर रोहा येथील बाजारात भाजी आणि फळ विक्रेते भाजी आणि फळे आणण्यासाठी जातात. जाताना उरलेली खराब भाजी आणि फळे खिंडीतील माकडांना खाऊ घालतात, तसेच काही प्रवासी त्यांना खाऊ देतात. त्यामुळे ही माकडे रस्त्यावर खाऊच्या आशेने उड्या मारत पळतात. यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत वनखात्याने योग्य ते नियोजन करण्याची मागणी होत आहे.

# रायगडात ३ मार्चला राष्ट्रीय लोकअदालत

## ५० हजार प्रकरणे निपटाऱ्यासाठी ठेवणार




**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशावरून रायगड जिल्ह्यात ३ मार्च रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात येणार आहे. या लोकअदालतीत विविध विभागातील ५० हजार प्रलंबित प्रकरणे निपटाऱ्यासाठी ठेवली जाणार आहेत, अशी माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव अमोल शिंदे यांनी दिली.

अमोल शिंदे यांनी बुधवारी (दि.१४) आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. न्यायालयीन खटल्यांचा जलद निपटारा व्हावा आणि खटले सामोपचाराने मिटावेत, हा यामागचा मुळ उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये न्यायालयात प्रलंबित असलेली भूसंपादन प्रकरणे, मोटार अपघात प्रकरणे ॲक्टखालील प्रकरणे दिवाणी अपिले, तडजोडपात्र पालिका व ग्रामपंचायत यांच्या घरपट्टी, पाणी पट्टी देयकाबाबतची वादपूर्व प्रकरणे, भारत संचार निगम लिमिटेड, महावितरण, राष्ट्रीयकृत बँका आणि पतसंस्था इतर थकबाकी बाबतची वादपूर्व प्रकरणे या लोकअदालतीमध्ये तडजोडीसाठी ठेवण्यात येणार आहेत.

या लोकअदालतीत विवीध विभागांतील दाखलपूर्व ५० हजार तर दाखल पश्चात १२ हजार प्रलंबित प्रकरणे ठेवली जाणार आहेत. अलिबागसह जिल्ह्यात १३ न्यायालयात एकाच वेळी एकाच दिवशी लोकअदालतीचे आयोजन करण्यात येणार आहे. जास्तीत जास्त नागरीकांनी या लोकअदालतीत सहभागी होऊन तडजोडीने प्रलंबित प्रकरणांचा निपटाऱ्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन रायगड जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव अमोल शिंदे यांनी केले आहे.

# रोठ बुद्रुक येथे महिलांना प्रथमोपचार प्रशिक्षण

**रोहे : प्रतिनिधी**

माघी गणेशोत्सव श्री गणेश जयंतीनिमित्त अंशुल स्पेशाल्टी मॉलेक्युस प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीच्या वतीने मंगळवारी (दि.१४) रोठ बुद्रुक ग्रामपंचायतीमध्ये लाईफलाईन इन्स्टिट्यूट ऑफ फर्स्ट एड ठाणे यांच्याकडून महिलांना प्रथमोपचार प्रशिक्षणाचे आयोजन केले होते.

या प्रशिक्षणाचे उद्‌घाटन रोहा पोलीस निरीक्षक देविदास मुपडे यांच्या हस्ते झाले. या प्रशिक्षणाला सरपंच नितीन वारंगे, ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर साळुंखे, मंगेश देवकर, अंशुल कंपनीचे युनिट हेड लक्ष्मण शिट्याळकर, एचआर डिपार्टमेंटचे हेड किशोर तावडे, एम. बी. मोरे महाविद्यालय धाटाव एनएनएस विभाग कार्यक्रम अधिकारी प्रा. मयूर पाखर आदी उपस्थित होते.

या वेळी डॉ. अपूर्वा देशपांडे यांच्या सहकाऱ्यांनी विविध प्रात्यक्षिके दाखवून महिलांना प्रशिक्षण दिले.



# हिरवळ महाविद्यालयात मुलाखत कौशल्यावर सेमिनार

**माणगाव : प्रतिनिधी**

हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट कॉलेज ऑफ सायन्स महाडमधील व्यवस्थापन विभाग व प्रशिक्षण आणि विकास कक्षामार्फत मुलाखत कौशल्य विकासवर मंगळवारी (दि. १३) सेमिनार आयोजित करण्यात आला.



या सेमिनारसाठी प्रमुख मान्यवर व्याख्याते म्हणून प्रा. सतीश नायर, प्रा. सिद्धार्थ बोस आणि प्रा. वृषाली निलाखे (महात्मा एज्युकेशन सोसायटी, पिल्लई इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च, पनवेल, मुंबई) उपस्थित होते.

शैक्षणिक आणि व्यवसाय या दोन्हींतील आपल्या कौशल्याचा उपयोग करून, प्रमुख पाहुणे प्रा. सतीश नायर यांनी मुलाखतीच्या तयारीच्या तपासण्यांबाबत विद्यार्थ्यांबरोबर चर्चा केली. त्यांनी यशासाठी लवचिकता आणि सतत शिकण्याच्या गरजेवर लक्ष केंद्रित करून मुलाखत प्रक्रियेतील बदलत्या कलांवर ओघवत्या शैलीत भाष्य केले.

प्रा. सिद्धार्थ बोस यांनी, मुलाखतीच्या तयारीबद्दल त्यांचे विचार मांडताना कटथ्रोट जॉब मार्केटमध्ये यशस्वी होण्यासाठी आवश्यक गुणांचा जसे प्रॉब्लेम सॉल्विंग टेक्निक, इमोशन इंटेलिजन्स आणि टेक्निक परफेक्ट यांच्या सर्वांगीण वाढीचे मूल्य अधोरेखित केले.

प्रा. वृषाली निलाखे यांनी, मॉडर्न, डायनॅमिक वर्कप्लेसच्या गरजा पूर्ण करण्यासाठी डिझाईन केलेल्या मुलाखतीच्या तयारीच्या तंत्रांबद्दल अमूल्य अभ्यासपूर्ण पीपीटी च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध उदाहरणांनी मार्गदर्शन केले. ट्रस्टचे अध्यक्ष किशोर धारिया यांनी, सेमिनार आयोजित केल्याबद्दल महाविद्यालयाचे आभार मानले. ट्रस्टच्या संचालिका सोनाली धारिया यांनी अशी उपयुक्त सेमिनार आयोजित केल्याबद्दल आयोजकांच्या प्रयत्नांचे कौतुक केले. मुख्य सल्लागार डॉ. संध्या कुलकर्णी यांनी, मान्यवरांनी मांडलेल्या दृष्टिकोनाचे कौतुक केले.

# अष्टविनायक क्षेत्र पालीत भक्तीमळा फुलला

**पाली : प्रतिनिधी**

अष्टविनायक देवस्थानांपैकी प्रख्यात पालीतील श्री बल्लाळेश्वराचा माघी मासोत्सव व श्री बल्लाळेश्वराचा जन्मोत्सव मंगळवारी (दि.१४) मोठ्या भक्तिमय वातावरणात झाला. या वेळी धार्मिक कार्यक्रम व विधी करण्यात आले.

बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी पहाटेपासूनच भक्तांच्या लांब रांगा लागल्या होत्या. संपूर्ण परिसरात मोठी यात्रा भरली होती. विविध ठिकाणातून पदयात्रादेखील आल्या होत्या.





जन्मोत्सवाला बाळगणेशाच्या मूर्तीला पाळण्यात टाकून भक्तिभावाने पाळणा हलविण्यात आले. या वेळी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष जितेंद्र गद्रे, उपाध्यक्ष वैभव आपटे, विश्वस्त प्रमोद पावगी, विश्वास गद्रे, अरुण गद्रे, अमोल साठे, डॉ. पिनाकिन कुंटे, माजी अध्यक्ष ॲड. धनंजय धारप आदींसह भक्त उपस्थित होते. जन्मसोहळ्याच्या कीर्तनास व इतर कार्यक्रमात भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जत्रेत विविध दुकानांतून लाखोंची उलाढाल झाली.

प्रशासन, नगरपंचायत व देवस्थान यांच्या समन्वयातून योग्य नियोजन करण्यात आले होते. तुकाराम दैठणकर(पुणे) यांचे सनईवादन, अभिषेक आणि श्रींचे जन्मोत्सव कीर्तन झाले. सायंकाळी श्रींचा पालखी सोहळा मोठ्या उत्साहात व भक्तिभावात झाला, तसेच श्री बल्लाळेश्वराला महानैवेद्य ठेवण्यात आले. वाहतूक सुरळीत रहावी व भाविकांना दर्शन व्हावे पोलीस तसेच देवस्थानचे सुरक्षारक्षकदेखील तैनात करण्यात आले होते.

परिवहन महामंडळाच्या बसेस पाली बाहेर थांबविण्यात आल्या होत्या. त्यामुळे वाहतूक कोंडी झाली नाही.

# माणगावात नेत्र शिबिरात १५४ रुग्णांची तपासणी

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावात शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व उद्योजक विजयशेठ चॅरिटेबल ट्रस्टतर्फे बुधवारी (दि.१४) मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात आले होते.

या शिबिरात शंकरा आय हॉस्पिटलचे नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. प्रकाश पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी १५४ रुग्णांची तपासणी करून ७८ नेत्ररुग्णांना पनवेल येथे नेऊन त्यांच्यावर मोफत यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली आहे.

शिबिरासाठी महेंद्र मेथा यांनी विनामूल्य जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे मेथा परिवारातर्फे विजय मेथा, मनीष मेथा, विधिता मेथा यांनी विशेष आभार व्यक्त केले.



शिबिर यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी विजय मेथा, सुप्रिया शिंदे, तनुजा हेमंत मेथा, छाया मेथा, विधिता मेथा, मनीष मेथा यांच्यासह शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेलचे टीम व्यवस्थापक डॉ. प्रकाश पाटील, डॉ. शिली वर्गीस, मृण्मयी जाधव, निशा शिंदे, नियती शिंदे, विशवनाथ पाटील, रामदास पवार व त्यांचे सहकाऱ्यांनी सहकार्य करीत विशेष परिश्रम घेतले.

# कणे प्राथमिक प्रशालेचा सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात

**पेण : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेची कणे प्रशालेचा जल्लोष २०२४ हा सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा झाला.

प्रशालेचे पदवीधर शिक्षक आदिनाथ पाटील, शिल्पा मॅडम, वर्षा मॅडम या शिक्षकांनी या छोट्या विद्यार्थ्यांकडून गेले महिनाभर सराव करून घेतला. या कार्यक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांची कोरिओग्राफी असो वा नाटिकेमधील संवाद, विनोदी शैलीत यामध्ये निपुणता आणून रंगमंचावर बेधडकपणे वावरणारे छोटे उस्तादांनी प्रेक्षकांना पोटभरून हसविले. लावणी, कोळी नृत्य, वारकरी नृत्य, धनगर नृत्य विद्यार्थ्यांनी सादर केले.



# भारत आणि इंग्लंडमध्ये आज तिसरा सामना

## टीम इंडियात होणार मोठे बदल; दोघांचे पदार्पण

**राजकोट : वृत्तसंस्था**

भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेतील तिसरा सामना गुरुवारपासून (दि.१५) राजकोटमध्ये खेळला जाणार आहे. या मालिकेत टीम इंडिया २-१ ने आघाडीवर आहे.

विशाखापट्टणम येथे खेळली गेलेली दुसरी कसोटी जिंकून त्याने शानदार पुनरागमन केले. हैदराबादमधील पहिली कसोटी इंग्लंडने जिंकली. या सामन्यासाठी भारतीय संघ प्लेइंग-११ मध्ये काही मोठे बदल करू शकतो. यामध्ये दोन खेळाडूंच्या नावांची सर्वाधिक



चर्चा होत आहे. यष्टिरक्षक ध्रुव जुरेल आणि मधल्या फळीतील फलंदाज सर्फराज खान यांना पदार्पणाची संधी मिळू शकते.

श्रेयस अय्यर आणि केएल राहुल दुखापतीमुळे बाहेर गेले आहेत. त्यामुळे भारतीय संघ मुंबईचा सर्फराज आणि उत्तर प्रदेशचा ध्रुव जुरेल यांच्यासोबत जाऊ शकतो. दोन्ही क्रिकेटपटूंच्या कसोटी पदार्पणाच्या आशा मंगळवारी बळकट झाल्या, जेव्हा या दोघांनी सराव सत्रात क्षेत्ररक्षण आणि यष्टिरक्षणात हात आजमावला आणि त्यानंतर नेटमध्ये बराच वेळ फलंदाजीही केली.

श्रेयस संघाबाहेर असल्याने आणि राहुल जखमी झाल्यामुळे रणजी ट्रॉफीमध्ये भरघोस धावा करणाऱ्या सर्फराज खानसाठी कसोटीचे दरवाजे उघडले आहेत. जो गेल्या काही वर्षांपासून रणजी ट्रॉफीमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणारा आहे. त्याने देशांतर्गत क्रिकेटमध्ये प्रथम श्रेणीमध्ये त्रिशतकही झळकावले आहे. ज्युरेलला भारतपेक्षा अधिक पसंती मिळू शकते, कारण तो एक चांगला फलंदाज आहे. भरतला सलग सात कसोटी सामन्यांमध्ये एकही अर्धशतक झळकावण्यात अपयश आले आहे. त्यामुळे त्याचा पत्ता कट होऊ शकतो.

# शालेय कबड्डी स्पर्धेत समता विद्यामंदिर अजिंक्य

**मुंबई : प्रतिनिधी**

ज्येष्ठ क्रीडा पत्रकार स्व. आत्माराम मोरे स्मृती आंतर शालेय सुपर लीग विनाशुल्क कबड्डी स्पर्धेचे अजिंक्यपद समता विद्यामंदिर-असल्फा शाळेने पटकाविले. एकूण शतकी १२० गुणांच्या धडाकेबाज खेळाने रंगलेल्या अंतिम फेरीत समता विद्यामंदिरने माणेकलाल मेहता मुंबई पब्लिक स्कूल संघाचा चार गुणांनी पराभव केला आणि अजिंक्यपदाच्या आत्माराम मोरे स्मृती चषकाला गवसणी घातली.

स्पर्धेच्या अंतिम फेरीत माणेकलाल स्कूलने चढाईपटू कुलदीप सिंग व बचावपटू शाइद पटेल यांच्या दमदार खेळामुळे पहिल्या डावात समता शाळेविरुद्ध ३९-२७ अशी मोठी आघाडी घेतली, परंतु उत्तरार्धात अष्टपैलू वेद सावंत, करण इंगवले व हर्ष पावसकर यांनी आक्रमक चढाया करून भराभर गुण घेतले आणि अखेर समता विद्यामंदिरला ६२-




५८ असा विजय मिळवून दिला. वेद सावंतने सर्वोत्तम कबड्डीपटूचा, कुलदीप सिंगने उत्कृष्ट चढाईचा तर शाइद पटेलने उत्कृष्ट पकडीचा पुरस्कार पटकाविला.

दादरच्या ताराबाई मोडक हायस्कूलने तृतीय, भायखळ्याच्या अँटोनियो डिसोझा हायस्कूलने चतुर्थ आणि अफॅक हायस्कूल चेंबूर, मुक्तांगण हायस्कूल करी रोड, चुनाभट्टी एमपीएस, अँटोनियो दासिल्व्हा हायस्कूल दादर संघांनी उत्तेजनार्थ चषक मिळविला.













पनवेल : तालुक्यात मंगळवारी माघी गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा झाला. या उत्सवानिमित्त भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेल, नवीन पनवेल, खारघर, कामोठे, कळंबोली, वळवलीसह विविध ठिकाणी भेट देत मनोभावे दर्शन घेतले. या वेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, सरचिटणीस नितीन पाटील, माजी नगरसेवक हरेश केणी, डॉ. अरुणकुमार भगत, अॅड. मनोज भुजबळ, बबन मुकादम, तेजस कांडपिळे, माजी नगरसेविका प्रमिला पाटील, माजी नगराध्यक्ष सुनील घरत, माजी उपनगराध्यक्ष सुभाष भुजबळ, भाजपचे कळंबोली शहर अध्यक्ष रवीनाथ पाटील, ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, खारघरचा राजाचे संस्थापक अध्यक्ष विजय पाटील, कामगार नेते रवी नाईक, राकेश भुजबळ, युवा नेते हॅप्पी सिंग, युवा मोर्चाचे समीर कदम, महिला मोर्चाच्या साधना पवार यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.




























जीवेत् शरदः शतम्!
उपदेश कोळी
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
प्रदीप कोळी

जीवेत् शरदः शतम्!
रबिंद्र पात्रा
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
महादेव नाईक,
सुनील म्हात्रे

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com